# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

## मा. विशेष महासभा दि. २६/१०/२०२१

**(दि. ०१/१०/२०२१ रोजीची तहकुब सभा)**

शुक्रवार दि. ०१/१०/२०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. ५१ ते ५६ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा मंगळवार, दि. २६/१०/२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | जैन दिनेश तेजराज | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ९) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| १०) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ११) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १२) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १४) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १५) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १६) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १७) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १८) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १९) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| २०) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| २१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २२) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २५) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २६) | जैन गीता भरत | सदस्या. |
| २७) | जैन सुनिता रमेश | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| २८) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २९) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| ३०) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ३१) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ३२) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३३) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३४) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३५) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३६) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३७) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३९) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४०) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४१) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४२) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४३) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ४४) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४५) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४६) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४७) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ४८) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४९) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५०) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५१) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५२) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५३) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५४) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५५) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५६) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५७) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५८) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५९) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६०) | सौंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६१) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६२) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६५) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६६) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ६७) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६८) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६९) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ७०) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७१) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७२) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७५) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७६) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ७७) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ७८) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ७९) | शर्मा भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | ॲड शफीक अहमद सादत खान | नामनिर्देशित सदस्य |
| ८१) | भोसले अनिल बाबुराव | नामनिर्देशित सदस्य |
| ८२) | अजित भगवान पाटील | नामनिर्देशित सदस्य |

<u>गैरहजर सदस्य -</u>

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| २) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| ३) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ४) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ५) | सय्यद नुरजाहाॅ नाझर हुसेन | सदस्या |
| ६) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ७) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ८) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ९) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| १०) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ११) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| १२) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| १३) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| १४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| १५) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |
| १६) | सिंह विक्रमप्रताप रमाप्रती | नामनिर्देशित सदस्य |

रजेचा अर्ज - निरंक

नगरसचिव :-

मा. विशेष महासभा शुक्रवार दि. ०१/१०/२०२१ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आली होती. सदर सभा ठरावाद्वारे तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील विषय क्र. ५१ ते ५६ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा मंगळवार, दिनांक २६/१०/२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित केलेली आहे.
प्रकरण क्र. ५१, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. याबाबतचा गोषवारा आपणास दिलेला आहे. गटनेत्यांनी आपआपल्या पक्षातील सदस्यांची नावं द्यायची आहेत. प्रकरण क्र.५१ साठी गटनेत्यांनी नाव माझाकडे दिलेली आहेत. काँग्रेस लोकशाही आघाडीची २ नावे आलेली आहेत १) मर्लिन मर्विन डिसा २) अशरफ मोहम्मद शेख शिवसेना पक्षाच्या गटनेत्यांनी दिलेल्या पत्रानुसार त्यांचा एक सदस्य ह्या समितीतुन कमी होणार होते आणि दोन सदस्यांनी राजीनामा दिलेला आहे अशा प्रकारे तीन सदस्यांची नाव गटनेता निलम हरिश्चंद्र ढवण यांनी दिलेली आहेत. १) शर्मिला अजित गंडोळी (बगाजी) २) अर्चना अरुण कदम ३) कुसुम गुप्ता ही तीन नाव शिवसेना पक्षाने दिलेली आहेत. भारतीय जनता पार्टीचे गटनेता हसमुख गहलोत यांनी पाच सदस्यांची नाव दिलेली आहेत. १) आनंद मांजरेकर २) मनोज दुबे ३) सुजाता पारधी ४) जयेश भोईर ५) सीमा शहा ह्या तिन्ही पक्षाची नाव आलेली आहेत. हे मी मा. महापौरांकडे देत आहे.
मा. महापौर :-

स्थायी समितीच्या सदस्यांची नाव मी घोषीत करत आहे. भारतीय जनता पार्टीचे सन्मा. नगरसेवक आनंद मांजरेकर, सन्मा. नगरसेवक मनोज दुबेजी, सन्मा. नगरसेविका सुजाता पारधीजी, आणि सन्मा. नगरसेविका सिमा शहाजी, सन्मा. नगरसेवक जयेश भाईरजी यांचे नाव मी ह्या ठिकाणी घोषीत करत आहे. तसेच शिवसेना पक्षा तर्फे गटनेत्या निलमताई ढवण यांनी मला नावे दिलेली आहेत त्यामध्ये स्थायी समिती सदस्यासाठी शिवसेनेमधुन सन्मा. नगरसेविका शर्मिला बगाजी सन्मा. नगरसेविका अर्चना कदमजी, सन्मा. नगरसेविका कुसुम गुप्ताजी यांची नावे मी ह्या ठिकाणी घोषीत करत आहे. काँग्रेस पक्षातर्फे गटनेते जुबेर इनामदारजींनी जी नाव दिलेली आहेत त्यापैकी सन्मा. नगरसेविका मर्लिन डिसा मॅडम, सन्मा. नगरसेवक अशरफ शेखजी, याची नाव ह्या ठिकाणी मी घोषीत करत आहे.
प्रकरण क्र. 51 :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.
ठराव क्र. 48 :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(३) अन्वये स्थायी समिती सदस्यांपैकी निम्मे (आठ) सदस्य माहे ऑक्टोबर २०२१ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत. तसेच उर्वरीत आठ सदस्यांपैकी शिवसेना पक्षाच्या दोन सदस्यांनी आपल्या स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये भारतीय जनता पार्टीचे ५, काँग्रेस लोकशाही आघाडीचे २ व शिवसेना पक्षाचा १ सदस्य निवृत्त होत आहेत. तसेच शिवसेना पक्षाच्या २ सदस्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. मा. उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण२००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवि-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ व

राजीनामा दिलेल्या दोन सदस्यांच्या जागी त्याच मान्यता प्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

सर्वपक्षीय गटनेत्यांनी तौलानिक संख्या बळाप्रमाणे सदस्यांच्या नावाची शिफारस केलेनुसार निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(५) अन्वये आठ सदस्यांची उर्वरीत कालावधीसाठी व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २३ अन्वये राजीनामा दिलेल्या दोन सदस्यांच्या जागी उर्वरीत कालावधीसाठी दोन सदस्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | श्री. आनंद दत्तात्रेय मांजरेकर | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्री. मनोज रामनारायण दुबे | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्रीम. सुजाता यशवंत पारधी | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. सिमा कमलेश शाह | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्री. जयेश भानुदास भोईर | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. मर्लिन मर्विन डिसा | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |
| ७ | श्री. अशरफ मोहम्मद शेख | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |
| ८ | श्रीम. शर्मिला विन्सन्ट बगाजी | शिवसेना |
| ९ | श्रीम. अर्चना अरुण कदम | शिवसेना (राजीनामा दिलेल्या सदस्याच्या जागी) |
| १० | श्रीम. कुसुम संतोष गुप्ता | शिवसेना (राजीनामा दिलेल्या सदस्याच्या जागी) |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५२, प्रतिवृत्त सादर करणेबाबत. (वैद्यकिय विभाग) (मा. महासभा दि. १९/०५/२०२१ (दि. २०/०४/२०२१ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १५)

जुबेर इनामदार :-

सन्मा. महापौर मॅडम, माझा एक प्रश्न आहे ह्या प्रतिवृत्तामध्ये सध्या साहेब आयुक्त महोदय किंवा आरोग्य विभागाचे अधिकारी सांगु शकतील आर.टी.पी.सी.आर. सध्याचा दर काय आहे पालिका त्याचे काय चुकवत आहे? किती देयके अदा करत आहे काय दराने पे करत आहे?

मा. महापौर :-

आर.टी.पी.सी.आर. चा दर विचारात आहे.

जुबेर इनामदार :-

आर.टी.पी.सी.आर. चा पालिकेचा दर काय ठरलेला आहे? म्हणजे आपण ह्या संस्थेला हे काम दिलेले आहे ते आपल्याकडे काय दराने ते ठरलेले आहे?

मा. महापौर :-

आर.टी.पी.सी.आर. चा दर सन्मा. सदस्य विचारत आहेत त्यांना सांगा.

संदिप शिंदे :-

सन्मा. पीठासीन अधिकारी महोदया, सन्मा. आयुक्त महोदय सर्व सन्मा. सभागृह सन्मा. सदस्य महोदयांनी ह्याठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे कोविडच्या काळामध्ये गेल्या दोन वर्षामध्ये आपण जे काही विविध काम केलेले आहेत आता ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६७ (३) खाली आपण आपत्ती व्यवस्थापन अधिनियमानुसार वेळोवेळी जी काही काम केली आहेत त्याचे प्रतिवृत्त मा. सभागृहाच्या अवलोकनार्थ आपल्या समोर सादर केलेले आहे. सन्मा. सदस्यांनी ह्याठिकाणी आर.टी.पी.सी.आर. च्या दराबाबत माहिती उपस्थित केलेली आहे. त्यास मी सांगु इच्छीतो की जेव्हा आपल्या इथे सर्व प्रथम १३ मार्च २०२० ला आपत्ती व्यवस्थापन कायदा लागु केला कोविडसाठी त्यानंतर आजपर्यंत आपण आर.टी.पी.सी.आर.च नाही तर अणेक ज्या वस्तु आपल्याला लागलेल्या होत्या त्या दराच्या बाबतीमध्ये वेळोवेळी शासनाच्या आदेशा प्रमाणे रेट कमी जास्त होत गेले होते. आपल्याला सर्वांना कल्पना आहे की सुरुवातीचा काळामध्ये तर ४५०० आर.टी.पी.सी.आर. चा रेट होता. आता तो कमी होऊन ३०० रुपया पर्यंत रेट आलेला आहे. आणि आजच्या परिस्थितीमध्ये तर आपण मोठ्या प्रमाणात आपली स्व:तची महापालिकेची लॅब असल्यामुळे आपण ते सर्व शहरातील नागरीकांना मोफत टेस्ट करत असतो. पण सुरुवातीचा काळामध्ये जेव्हा हा कोविड सर्वांसाठी नविन होता त्यावेळेस आपण आर.टी.पी.सी.आर. हे काही खाजगी संस्थमार्फत सुध्दा करुन घेतलेले होते. त्यामुळे दरामध्ये जशी जशी शासनाकडून ज्या सुविधा उपलब्ध होत गेल्या तसा तसा दर कमी होत गेला. सुरुवातीचा दर ४५०० पासुन सुरुवात झालेला होता. आणि याबाबतचा डिटेल वृत्तांत आहे ते आपल्या अवलोकनार्थ सादर केलेला आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम काही सुचना मांडायच्या असतात सभा सुरु होण्या पुर्वी परंतु पदाधिकाऱ्यांचे माईक इकडे म्युट केले जातात महापौर मॅडम मला ह्या सभेच्या माध्यमातुन आपल्याला एक विनंती करायची आहे की आपण आज ही तहकुब सभा आपण घेत आहोत आपली चालु झालेली आहे त्याच बरोबर आपण एक विशेष महासभा अडीच वाजता लावलेली आहे महापौर मॅडम तर माझे असे म्हणणे होते की आपले जे गटनेते आहेत विरोधी पक्षनेते आहेत त्यांना सर्वांना विश्वासात घेऊन त्यांना सांगुण की हीच सभा आपण जर पुढे चालुच ठेवली तर महापौर मॅडम आपला वेळही वाचेल आणि दिवाळीचा सण तोडावरती आहे. प्रत्येक सन्मा. सदस्यांचेही तेच म्हणणे आहे की आपण हीच सभा पुढे चालुच ठेवायची तर माझी महापौर मॅडम आपणाला विनंमी राहील की आपण सर्व गटनेते आणि विरोधी पक्ष नेत्यांना विचारुन ह्याला संमती द्यावी. धंन्यवाद.

मा. महापौर :-

सन्मा. सर्व गटनेत्यांना विनंती आहे की आपले सभागृहनेते प्रशांत दळवीजीने यांनी मागणी केलेली आहे की तहकुब सभा संपल्या नंतर लगेचच आपली जी आजची महासभा आहे ती सुरु करायची का? जर आपली संमती असेल तर आपण कृपया हाथ वर करुन संमती दाखवावी.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम हा विषय याच्यावर आपण परत येऊ आपली प्रतिवृत्तावर चर्चा चालु होती शिंदे साहेब माहिती देत होते.

प्रशांत दळवी :-

जुबेर साहेब आपली चर्चा पुढे चालुच राहील परंतु आपण याला सुरुवातीलाच अनुमती दिलीत तर मग आपण ही कॅरीऑन पुढे मिटींग करु शकु. माझी विनंती आहे तुम्हाला.

जुबेर इनामदार :-

आमच्या काँग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने आमची अनुमती आहे. याला कंन्टीन्यु करु शकलात तर अती उत्तम. त्याच्यामध्ये कुठली तांत्रिक बाबीची अडचण येता कामा नये सचिवांना विचारा.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, भारतीय जनता पक्षा तर्फे आम्ही पण तयार आहोत पण ज्या हिशेबाने जुबेर साहेबांनी सांगितले की तांत्रिक बाबीवर लक्ष ठेवून सचिव महोदय यांनी याचावर सांगावे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, शिवसेनेच्या वतीने मी देखील ह्या गोष्टीला मान्यता देते, कंन्टीन्यु करायला हरकत नाही परंतु तांत्रिक बाब लक्षात घेऊन परवानगीन देण्यात यावी.

मा. महापौर :-

सचिव साहेब तांत्रिक अडचण काही आहे का सभा कंन्टीन्यु करण्या करीता?

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम ह्या विषयावर जितपर्यंत मला आठवन आहे की ऑलरेडी अशी एक सभा झालेली आहे मागच्या काळामध्ये. आणि त्या अनुषंगाने माझं आणि जुबेर साहेबांच आणि ढवण मॅडमचं ह्या सगळ्यांची अनुमती आहे म्हणजे एखादा झाले असेल प्रकरण तर आपण असं करु शकतात.

नगर सचिव :-

खरतर आपण ह्यापुर्वी टाईम ठरवुन दिलेला होता दुसऱ्या सभेचा २ वाजुन ३० मिनिटानी जर सभागृहाची तशी भावना असेल आणि सर्वांची अनुमती सर्व पक्षीयांची अनुमती आणि मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी जर परवानगी दिली तर आपण ह्या प्रमाणे पुढे कंटीन्यु करु शकतो दुसरी सभा ही सभा संपल्या नंतर.

निलम ढवण :-

महापौर मॅडम खरतर आजची ही ऑनलाईन सभा एक दिवस अगोदर पत्र निघाले होते. परंतु दुसऱ्याच दिवशी शासनाचे परिपत्रक आले होते की ऑफलाईन घ्या म्हणून घ्यायला काही हरकत नाही म्हणून तर हे घेतलं असतं तर बरं झालं असतं.

मा. महापौर :-

ताई आपल्या माहितीसाठी सांगते, मला तर खुप आनंद झाला असता तुमच्या सोबत सभागृहामध्ये बसण्यासाठी परंतु आपलं सुचना परिपत्रक हे आधी काढलेलं होतं आणि ते ऑनलाईनच्या माध्यमातुन होतं. काही सन्मा. नगरसेवक ऑनलाईन मिटींग आहे म्हणून मला कल्पना देऊन बाहेरुन मिटींग हे करत आहेत. जॉईंट झालेले आहेत. आणि दुसरी गोष्ट मी कालच आपले सचिव साहेब यांच्या सोबत सभा गृहामध्ये जावून व्हिजीट केली तर सभागृहाचे कामकाज सध्या अजुनही चालु आहे. माईक सिस्टीमचे काम अजुन झालेले नाही. कारपेट अंथरायचे काम झालेलं नव्हतं आणि तिथे लाकडाला पॉलीश लावलेली होती त्याचा वास भरपुर येत होता दोन तीन तास जर आपण बसलो असतो तर त्या वासाने आपले डोळे झोंबले असते आणि शिवाय वासाने त्रासही झाला असता. म्हणून मग मी सचिव साहेबांना सांगितलं की आजची ही मिटींग आपण ऑफलाईन न घेता ऑनलाईन घ्यावी जेणे करून पुढच्या मिटींगला संपुर्ण सभागृह तयार होईल आणि चांगली व्यवस्था प्रशासनाच्या माध्यमातुन होईल. सबंधित अधिकाऱ्याला मी ह्या ठिकाणी सुचना करु इच्छीते की

ज्याच्याकडे हा विभाग आहे त्यांनी सभागृह पुढच्या मिटींगच्या आधी व्यवस्थित करुन सन्मा. सदस्यांना बसणे योग्य करावे जेणे करुन सभा त्याठिकाणी घेता येईल.

निलम ढवण :-

ओके थँक्यु.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आता त्याला मान्यता द्या सचिवांचे बोलणे झालेले आहे.

मा. महापौर :-

सचिव साहेब आताच्या तहकुब सभे नंतर पुढची महासभा ही कंटीन्यु करण्या करीता परवानगी देत आहे.

प्रशांत दळवी :-

धंन्यवाद.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम चर्चा चालु असताना प्रशांत दळवी साहेब मधेच बोलले.

प्रशांत दळवी :-

जुबेर साहेब विषय असा होता की तांत्रिक अडचण तिही होती की आपल्याशी चर्चा झाल्या नंतर पदाधिकाऱ्यांचे माईक म्युट केले होते त्यामुळे सुरुवातीला बोलता आले नाही त्या बद्दल दिलगीरी व्यक्त करतो. म्हणून विषय झाला असता आणि मग आपण त्यानंतर ही घोषना केली असती हे उचीत झाले नसते.

जुबेर इनामदार :-

बरोबर ठिक आहे शिंदे साहेब, महापौर मॅडम माझा विषय संपला नाही. शिंदे साहेब आपल्याला सध्या आर.टी.पी.सी.आर. पालिकेच्या माध्यमातुन होत असलं तर आपल्याला खर्च काय बसतो आहे?

संदिप शिंदे :-

सन्मा. सदस्य महोदय, आपली आर.टी.पी.सी.आर. लॅब नंतर केलेली आहे. हा सुरुवातीचा काळातला जो काही खर्च झालेला आहे त्याचे प्रतिवृतत आपल्या माहितीसाठी सभागृहा समोर अवलोकनार्थ ठेवलेला आहे. आपण प्रश्न विचारला होता की आर.टी.पी.सी.आर. चे दर काय आहेत तर सुरुवाती पासुन म्हणजे १३ मार्च २०२० पासुन आजपर्यंत जे काही दरामध्ये शासनाच्या आदेशा प्रमाणे कमी कमी रेट होत गेले त्याची मी सभागृहाला माहिती दिली होती. सुरुवातीला ४५०० रुपये रेट होते म्हणजे मार्च २०२० मध्ये आणि आजमितीस जर विचार केला तर ते ३०० रुपये पर्यंत खाली आलेले आहेत. आणि स्व:तची आपली लॅब असल्यामुळे आपण आता दुसऱ्या कोणा खाजगी आर.टी.पी.सी.आर. आपण करुन घेत नाही. आपण उलट सर्व शहरातील नागरीकांना फ्रीमध्ये आर.टी.पी.सी.आर. टेस्ट करतो. अंदाजे आपण सध्या २ हजारच्या आसपास डेली आपण आर.टी.पी.सी.आर. टेस्ट करतो. त्याच्यामध्ये आपल्या महापालिकेची लॅब आहे त्याची १६०० ची कॅपॅसिटी आहे. प्लस आपल्याला शासन दररोज ५०० टेस्ट फ्री करुन देते. आणि गेले ४-५ महिन्या पासुन मा. आयुक्त महोदयांनी जेव्हा आपल्या आर.टी.पी.सी.आर. टेस्टची संख्या वाढलेली होती तेव्हा शासनाला विनंती केली होती जे जे हॉस्पीटल आहेत की तुम्ही ५०० करा. असे आर.टी.पी.सी.आर. आपण ॲव्हरेज टेस्ट करत असतो. हे जे प्रतिवृतत सादर केले आहे ते सुरुवातीचा काळामध्ये जे काही आपले लॅब स्थापन करण्या पुर्वी जो काही खर्च झाला होता त्याच्या अनुषंगाने प्रतिवृत्त अवलोकनार्थ सादर केलेले आहे.

जुबेर इनामदार :-

शिंदे साहेब तुमच्या माहितीसाठी तुम्ही तेव्हा नव्हता तुम्ही महापालिकेला जॉईंट झाले नव्हते तत्कालिन आयुक्तांना आम्ही आमच्या पदाधिकाऱ्यांच्या सभेमध्ये विनंती केली होती की महापालिकेच्या वतीने निशुल्क दरात आर.टी.पी.सी.आर. करण्यात यावे जेव्हा कोविडची सुरुवात गेल्या मार्च २०२० मध्ये झाली. माझा एक साधा सिम्पल प्रश्न होता तुम्हाला की तुम्ही बोललात की ह्याच्यामध्ये त्याची नोंद नाही. हे कधी पर्यंत आहे? ही जी तुम्ही आम्हाला माहिती उपलब्ध करुन दिली ही कुठल्या तारखेपर्यंत राहील?

संदिप शिंदे :-

सन्मा. सदस्य महोदय आपल्या समोर जो चार्ट आहे त्याचे कृपया अवलोकन कराव. त्यामध्ये आपण बघा शासनाचा आदेश आणि शासनाचा काय रेट होता आणि महापालिकेने त्या वेंडर सोबत डिस्कशन करुन रेट कमी करुन आपण तशा टेस्ट केल्या होत्या. त्याची संख्या आणि रेट हे आपण पुर्ण चार्ट डिटेल्स आपल्याकडे दिलेले आहे. उदा. १७ मार्च २०२० या रोजी शासनाचे रेट होते ४ हजार ५०० परंतु आपण ३ हजार ५०० ने करत होतो त्यावेळेस. आपण नागरीकांना फ्री मध्येच टेस्ट केलेल्या आहेत. आपण ज्या वेंडर मार्फत केले आहे त्यांना आपण पेड केलेले रेट इथे आपण सादर केले होते. त्याच्या नंतर १३ जुन २०२० ला शासनाच्या आदेशा प्रमाणे काय रेट होते आणि त्याच्या नंतर आपण काय केले ते २२०० रुपयाने आपण त्याच्याशी वाटाघाटी करुन कमी रेट केले होते. परत काही दिवसा नंतर पुन्हा रेट कमी झाले म्हणून १९०० रुपयाने केले, त्याच्या नंतर पुन्हा कमी झाले म्हणून १२०० रुपयाने केले. त्याचय नंतर ९८० ने केले आणि त्याच्या नंतर आपली स्व:तची लॅब असल्यामुळे आता त्याचे काही लॅब साठी आवश्यक साहित्य लागतात ते आपण उपलब्ध करुन देतो आणि आपण टेस्ट फ्री मध्ये करतो.

जुबेर इनामदार :-

साहेब मी कदांचित माझा प्रश्न मी व्यवस्थित उपस्थित करु शकत नाही असे मला वाटते. मी तुम्हाला एक साधा प्रश्न विचारला आपला खर्च काय येतो?

संदिप शिंदे :-

टोलट खर्च का?

जुबेर इनामदार :-

नाही साहेब टोटल खर्च आर.टी.पी.सी.आर. करण्याचा................

संदिप शिंदे :-

सन्मा. सदस्य तुम्हाला आर.टी.पी.सी.आर. वर झालेला खर्च पण सांगतो. एप्रिल २०२० ते नोव्हेबर २०२० ह्या दर्म्यान ५ कोटी ५३ लाख ३ हजार ५०० रुपये आपला आर.टी.पी.सी.आर. वर खर्च झाला होता.

जुबेर इनामदार :-

साहेब मी आजच्या तारखेचा दर तुम्हाला विचारत आहे.

संदिप शिंदे :-

आज दर उपलब्ध नाही फ्री मध्ये टेस्ट करतो सन्मा. सदस्य महोदय आपली लॅब आहे स्व:तची.

जुबेर इनामदार :-

मान्य आहे फ्री मध्ये करत असताना...............

मा. आयुक्त :-

जुबेर भाई तुमचा मुद्दा मला कळालेला आहे.

जुबेर इनामदार :-

काही तरी साहित्य किट्स लागत असेल की नाही?

मा. उपमहापौर :-

जुबेर भाई आयुक्त महोदय माहिती सांगत आहेत.

मा. आयुक्त :-

उपायुक्त वैद्यकिय आणि आणि ॲडिश्नल कमिश्नर वैद्यकिय तुम्हाला मी सांगतो की एक टेस्ट करण्यासाठी किती खर्च येतो आजचा असे फ्री मध्ये करतो पण त्याला ५० रुपये खर्च येतो १०० येतो, १५० येतो की ३०० येतो याचा म्हणजे त्याचे केमिकल असेल तुमच्या काही टेस्ट असेल, त्याला काही लागणारे त्याचा पर आर.टी.पी.सी.आर. साठी आपल्या लॅबसाठी लागणारा खर्च किती येतो? तुम्ही जनतेला फुकट करता ती वेगळी गोष्ट आहे.

संदिप शिंदे :-

सन्मा. पिठासीन अधिकारी महोदया सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्द्या प्रमाणे मी सुरुवातीला पण सांगितले होते की आपल्याला आज रोजी आपल्या लॅब मध्ये जो काही एका टेस्ट मागे जो खर्च येतो तो अंदाजे २०० ते २३० पर्यंत येतो. त्याच्या मध्ये आपले सगळे केमिकल्स असतील त्याला लागणारे साहित्य असेल याचे सर्व धरुन २३० रुपया पर्यंत आपल्याला खर्च येतो एका आर.टी.पी.सी.आर. टेस्ट मागे.

जुबेर इनामदार :-

साहेब याच्यात तुम्ही जो खर्च दिलेला आहे तो कधी पर्यंतचा आहे ? ह्याच्यात ज्या तारखा दिसत आहेत.

संदिप शिंदे :-

सन्मा. सदस्य महोदय, हे गेल्या २ वर्षामध्ये वेळोवेळी आपण केलेले प्रतिवृत्त आपल्या समोर अवलोकनार्थ सादर केले होते. त्याच्यात तारीख निहाय आम्ही सादर केले की कुठल्या तारखे पासुन किती तारखे पर्यंत किती खर्चाने आपण केले होते त्याअनुषंगाने मी आता आपल्याला स्पष्टीकरण म्हणले की एप्रिल 2020 ते नोव्हेंबर 2020 ह्या काळातले आपल्या समोर विषय आलेला होता. आणि त्याचे रेट आणि किती टेस्ट केल्या होत्या किती रक्कम झाली होती त्याचा डिटेल चार्ट आपल्या समोर ठेवलेला आहे. त्याचे कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

जुबेर इनामदार :-

याच्यामध्ये काही जागेवर काही खर्च 2021 चे म्हणजे ह्या चालु वर्षाचे सुध्दा याच्यामध्ये त्याचा उल्लेख केलेला आहे. माझा एक साधा प्रश्न आहे तुम्हाला परत मार्च पर्यंत तुम्ही केले आहे जानेवारीचा शेवटचा हा खर्च दाखवलेला आहे मार्चचा दाखवला आहे की त्याचा पुढचा महिन्याचा म्हणजे चालु महिन्या पर्यंतचा दाखवलेला आहे.

संदिप शिंदे :-

सन्मा. सदस्य मोहदय कृपया आपण चार्टचे अवलोकन करा हे नोव्हेंबर 2020 पर्यंतचेच आपल्या समोर हा चार्ट सादर झालेले आहे. त्याच्यामुळे त्याच्या नंतर रेट द्यायचा विषय येत नाही. 11 नोव्हेंबर 2020 ला आपली स्व:तची लॅब सुरु झाली त्याच्या नंतर आपण आपले लॅब मार्फत टेस्ट केलेल्या.

जुबेर इनामदार :-

मी तुम्हाला परत विचारतो शिंदे साहेब कधी पर्यंत तो खर्च हा जो तुम्ही प्रतिवृत्त दिलेला आहे त्याच्यामध्ये आहे मार्च पर्यंत आहे ऐप्रिल पर्यंत आहे मे पर्यंत आहे, ऑगस्टचा आहे, कधी पर्यंतचा आहे ?

संदिप शिंदे :-

सन्मा. सदस्य महोदय 11 नोव्हेंबर 2020 पर्यंत जो काही आपण खाजगी लॅब मार्फत टेस्ट केल्या होत्या त्याचे प्रतिवृत्त आहे. त्याच्या नंतर आपली स्व:तची लॅब झाल्या मुळे नंतर दुसऱ्या खाजगी वेंडर कडून करायचा विषय आलेला नाही आर.टी.पी.सी.आर.

जुबेर इनामदार :-

मी प्रश्न आर.टी.पी.सी.आर. च्या पुढे गेलो आहे शिंदे साहेब. आय एम सॉरी टू से मी आर.टी.पी.सी.आर. चा जो प्रश्न होता त्याच्या पुढे जावून मी विचारत आहे. माझा आवाज क्लियर नाही येत का ?

नगर सचिव :-

तुमचा आवाज येत आहे.

जुबेर इनामदार :-

मी आता त्याच्या पुढे जावून तुम्हाला विचारत आहे की तुम्ही केलेला खर्च हे जे तुम्ही प्रतिवृत्त दिलेले आहे तो कुठल्या महिन्या पर्यंत आहे ?

संदिप शिंदे :-

सन्मा. सदस्य महोदय आम्हाला तुमचा प्रश्न लक्षात येत नव्हता कारण आर.टी.पी.सी.आर. वर चर्चा चालु होती. आपल्या समोर विषय सादर केलेला आहे पहिला विषय आहे तो त्यामध्ये ऑक्टोंबर 2020 पर्यंत जो काही खर्च झाला तो आहे. आणि त्याचा नंतर ऐप्रिल म्हणजे ह्या ऐप्रिलच्या सभेवर आलो होतो 20 एप्रिल पर्यंत झालेला खर्च अशा दोन प्रकारचे आपल्या समोर प्रतिवृत्त अवलोकनार्थ सादर केलेले आहेत.

मा. उपमहापौर :-

20 एप्रिल 2021

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय मला वाटते कोविडचा विषय आटोक्यात आलेला आहे. परमेश्वरी कृपा राहीली तर तिसरी लाट येणार नाही असे आपण गृहीत धरु. आणि प्रार्थनाच करु शकतो याच्या पलिकडे काही नाही. मात्र साहेब कोविडचा हा खर्च आटोक्यात आणता येईल, कमी करता येईल हा खर्च जमेल तितका आपल्याला साहेब हा कमी प्रमाणात करुन कोविडची लढाई आपल्याला सुरु ठेवावी लागेल. आणि ठेवताना महापालिकेची आर्थिक बाब हलाकिची आहे हे तुमच्याही समोर आहे. राज्य शासनाकडून विशेष काय अनुदान प्राप्त होणार नाही अथवा आपल्याला सध्या अपेक्षा करणे योग्य नाही कारण हे पुर्ण राज्य कोविड परिस्थितीमध्ये फक्त राज्य नाही पुर्ण देश खरतर कोविड परिस्थितीचा लढा देत आहे. तर आयुक्त महोदय ही तुमची जबाबदारी राहील. ह्या पुढचा काळामध्ये आपल्याला जमेल तितका खर्च कमी करुन बाकिच्या विकासाचा कामासाठी आपल्याला हा निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. माझे ऐकून घेतले त्याच्या बद्दल धंन्यवाद. महापौर मॅडम आपले सदस्य अनिल सावंतलाही बोलायचे आहे. तर त्यांना जरा अनम्युट करा.

मा. महापौर :-

मला असे वाटते की प्रतिवृततामध्ये तुम्ही आता काय बोलणार. तुम्हाला आयुक्तांनी सादर केलेले आहे वाचनासाठी दिलेले आहे. गेल्या महिन्या पासुन आपल्याकडे ते प्रतिवृत्त आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, सभागृह हे मला वाटते आपली भावना व्यक्त करण्यासाठीच आहे.

मा. महापौर :-

इतरही विषय आहेत ना.

जुबेर इनामदार :-

मी माझी केली अनिल सावंतला करु द्या. आपलेच काही तरी बोलतील वाईट तर काही बोलणार नाहीत त्याचा फायदा पालिकेलाच होणार आहे.

मा. उपमहापौर :-

सन्मा. सदस्या अनिल सावंतजी बोला.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम धंन्यवाद बोलायला दिल्या बद्दल महापौर मॅडम, प्रश्न असा आहे डी.एम.सी. ने आता उल्लेख केला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 37 (3) (क) खाली जो खर्च केलेला आहे आयुक्तांना जे अधिकार आहेत तर त्यामध्ये त्यांनी तो खर्च केलेला आहे. महासभेने त्याला मंजुरी दिलेली आहे पण कलम 37 (3) (क) काय म्हणते आहे मी फक्त एकच लाईन वाटतो अशा कारवाई मुळे कोणताही खर्च अशा कारवाईमुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च या विषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याकडे ताबडतोब ठेवले पाहिजे. आणि आज प्रशासन दिढ वर्षा नंतर हे प्रतिवृत्त सादर करत आहे. ताबडतोब पाठवला पाहिजे. आता ह्या खर्चा विषयी एका सन्मा. सदस्याने भ्रष्ठाचाराचे प्रेस कॉफरंन्स घेऊन आरोप केले होते. आता ह्या दिढ वर्षा नंतर आम्ही काय करायचे ह्या खर्चाचे? गेली दिढ वर्ष रेमडिसिवीरच्या बाबतीत फार मोठा घोटाळा प्रशासनाने केलेला आहे त्याचे वारंवार मी आरोप केले. त्यावेळी काही हॉस्पीटलला उधारीच्या तत्वावर रेमडेसिविर ईंजेक्शन देण्यात आली. प्रायव्हेट हॉस्पीटलने हजारोच्या हिशेबाने पेशंट जवळून ते रिकव्हर केले ते इंजेक्शन. पण पालिकेला त्यांनी रिटर्न केले आहे की नाही याचा मी डेटा स्थायी समितीमध्ये कन्टीन्यु मागत आहे परंतु अजुनपर्यंत काही प्रशासनाने दिलेला नाही. आणि हे ताबडतोब प्रतिवृत्त सादर करायला पाहिजे ते दिढ वर्षा नंतर देतात, काय करायचे जबाबदारी आहे की नाही ?

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य अनिल सावंतजी आपण बोलत आहेत ते अतिशय बरोबर बोलत आहेत मी प्रशासनाला सांगु इच्छीते की तुम्हाला ज्या काही गोष्टी तुम्ही खर्चाच्या बाबतीतमध्ये असतात त्या तुम्ही स्थायी समितीला नंतर मग महासभेला जो तुम्ही खर्च केलेला आहे ते द्यायला दाखवायला पाहिजे. परंतु एक एक दिढ दिढ वर्षा नंतर तुम्ही काय खर्च केलेला आहे कसा खर्च केला आहे तुम्ही आता देता. तर त्यांचेही म्हणणे बरोबर आहे. परंतु ह्यापुढे आता जे घडलेले आहे किंवा घडून गेलेले आहे ते तर आपण परत करु शकत नाही परंतु याच्यापुढे अशा पध्दतीचे कामकाज आम्ही सहन करणार नाही कोणीही सहन करणार नाही कारण इथे पदाधिकाऱ्यांना उत्तर द्यावे लागते. म्हणून कृपया सर्व प्रशासनाला विनंती आहे की तुम्ही लगेचच खर्चाच्या बाबी स्थायी समितीपुढे सादर कराव्यात.

अनिल सावंत :-

धन्यवाद महापौर मॅडम प्रशासनाने मला वैयक्तिक केला तरी चालेल पत्र पाठवून त्यांनी खुलासा करावा की दिढ वर्षा नंतर हा खर्च महासभे समोर का सादर केला आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, मी अनिल सावंत सन्मा सदस्य यांच्या मताशी मीही सहमत आहे की जो खर्च केला गेला तो तातकाळ आपल्याला महासभेपुढे त्यांनी द्यावा परंतु एक गोष्ट त्यामध्ये असे आहे की त्यांनी जो आता काही प्रशासनावरती आरोप केला रेमडिसिवीर इंजेक्शनचे तर मलाही त्यांना विनंती राहील की आपण जे काही इथे तफावत दिसली आपल्याला किंवा जो मग घोटाळा झाला आपण तो तातकाळ आयुक्तांच्या निदर्शनास आणुन द्यावा. आणि त्या संदर्भामध्ये जर कोणी दोषी असेल तर त्याच्या वरती आयुक्त महोदय तात्काळ कारवाई करतील आपण ते द्यावे आयुक्त महोदयांना.

मा. महापौर :-

बरोबर, पुढचा विषय घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 53, महापालिकेच्या DCH/DCHC/CCC रुग्णालय येथे विना हत्यारी पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत प्रतिवृत्त. (मा. महासभा दि. २३/०६/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १८)

ध्रुवकिशोर पाटील :-

धन्यवाद महापौर मॅडम मला बोलायला दिल्या बद्दल मला अभिमान आहे महापौर मॅडम महापालिकेच्या डी.सी.एस.सी., व सी.सी.सी., यामध्ये सुरक्षा रक्षक नेमणे करीता आपल्या दालनामध्ये आपल्या अध्यक्षतेखाली मिटींग आपण लावली होती. या मिटींगमध्ये रुग्नालय, रुग्णालयामध्ये काय चालले आहे त्याचा आढावा घेतला होता, महापालिकेच्या किती आस्थापना आहेत, इमारती आहेत, त्याच्यामध्ये किती सिक्युरीटी गार्ड आहेत आणि आपल्याला हे महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी फोर्सचे किती आपल्याला कर्मचारी लागणार आहेत, पोलीसांना आपण त्यांना किती मॅन पॉवर उपलब्ध करुन देणार आहात याचा उहापोह आपण केला होता. मॅडम ह्यामध्ये माझा माहिती प्रमाणे आपण त्यांना फक्त 3 महिन्या करीता परवानगी दिली होती तात्पुरती की महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी फोर्स चे जे जवान आहेत त्यांची सिक्युरीटी आपण आपल्या पालिकेच्या आस्थापनेवरती फक्त 3 महिने आपण प्रायोगिक तत्वावर घ्यायची. त्याच्या नंतर त्यांनी जर चांगले काम केले असेल तर मग आपण त्यांना मुदतवाढ द्यायचे असे आपले ठरले होते. आणि हे करत असताना त्यांची जी पॉलिसी होती ती पॉलिसी अशी होती की एक महिन्याची सिक्युरीटी डिपॉसिट, सॅलरी, ते त्यांनी द्यायचे म्हणजे महापालिकेने. त्याच्या नंतर 3 महिन्याचा पगार त्यांच्याकडे ॲडव्हान्स ठेवावा. म्हणजे अशा त्यांचा कंडीशन होत्या अशा त्यांचे कम्पन्शन होते. ॲक्च्युअली मॅडम हे उलटे आहे महापालिका कॉट्रॅक्टरला कम्पंशन करते कॉट्रॅक्टरने महापालिकेला कंम्पशन केलेले आहे. ते सरळ सरळ चुकिचे आहे मॅडम. आजतगयात महापालिकेमध्ये सगळ्या कॉट्रॅक्टरचे सगळ्या ठेकेदारांची सगळ्या कंपनींची सिक्युरीटी डिपॉसिट असते आज हे उलटे झाले आहे की आपल्या महापालिकेने त्यांना दिली. वास्तविक त्यांची मॅनपॉवर आपण घेतो. ठिक आहे एक महिन्याचा पगार त्यांना आपण ॲडव्हान्समध्ये दिला पाहिजे नो डाऊट परंतु तीन तीन महिन्याचा पगार त्यांच्याकडे सिक्युरीटी डिपॉसिट ठेवायचा हे चुकीचे आहे. दुसरी गोष्ट महापालिकेने त्यांना त्यांच्यासाठी करार करतांना एक वर्षाचा करार केलेला आहे. महापौरांनी आणि पदाधिकारी होते त्या मिटींगला आणि सर्व पक्षीय गटनेते होते त्या सगळ्यांनी सांगितले की टेम्प्ररी 3 महिने पर्यंत आपण त्यांना द्यायला पाहिजे. असे असताना निर्णय झालेला असताना सुध्दा प्रशासनाने

आपल्या निर्णयाची अंमलबजावणी न करता त्यांनी स्वतच्या हिशेबाने मनमाणी केलेली आहे ते टोटली चुकीचे आहे. त्याच प्रमाणे मॅडम की आपल्या ऑडिट डिपार्टमेंटने आणि लॉ डिपार्टमेंटने ह्यामध्ये असे सांगितले आहे की शासनाच्या नियम प्रमाणे वेतन प्रदान करणे हरकत नाही परंतु तीन महिन्याचे वेतन इतकी रक्कम अग्रीम किंवा अनामत ठेवावी लागणार असल्याने संबंधित ऐजन्सीस कडून सुरक्षा अनामत पोटी बँक गॅरंटी घेणे अथवा डी.डी. घेणे उचित राहील. असा क्लियर कट रिपोर्ट असताना सुध्दा त्या महाराष्ट्र सिक्युरीटी फोर्स ने पालिकेला डिनाय केले आणि त्यांची एवढी हिम्मत की पालिकेच्या ऑडिटरने आणि लॉ डिपार्टमेंटने दिलेला आदेश सुध्दा त्यांनी मान्य नाही केला आणि त्यांनी स्पष्ट मणा केले आणि मणा करुन सुध्दा आपण त्यांची सिक्युरीटी फोर्स एक वर्षाची घेतलेली आहे. का? महापालिकेवरती त्यांचा असा काय दबाव आहे? महापालिका त्यांच्या पुढे कशाला झुकते? याचे कोढ मॅडम आम्हाला अजुनही पडलेले आहे. तर असे असताना आपल्या लॉ डिपार्टमेंटने आपल्या ऑडिट डिपार्टमेंटने क्वेरी काढून सुध्दा त्याची अंमलबजावणी केली नाही. तर महापौर मॅडम प्रशासनाने याच्यावरती खुलासा करावा. तसेच माझे क्लियर मत आहे मॅडम की ॲसपर आपल्या ॲक्ट प्रमाणे जर समजा पालिकेला यांची सिक्युरीटी फोर्स घ्यायची असेल तर ह्यात आपल्याला धोरण जर बदलायचे असेल तर धोरनात्मक निर्णय घ्यायचा आपल्याला अधिकार आहे. तो आम्हाला आहे. प्रशासनाने महासभेत गोषवारा दिला पाहिजे तो निर्णय दिला पाहिजे की आम्हाला ह्यांची सेवा घ्यायची आहे तर जर आम्ही निर्णय दिला तर महापालिका यांची सेवा घेऊ शकते अदरव्हाईज घेऊ शकत नाही. आता गोषवाऱ्यामध्ये नमुद केलेले आहे की 67 (3) (क) खाली हा आयुक्तांना अधिकार आहे परंतु आणीबाणीच्या परिस्थितीत आता अशी कोणतीही आणीबाणीची परिस्थिती निर्माण झालेली नाही. त्यावेळी होती तेव्हा एखादा इनसिडेंट घडला आणि त्यांनी इमिजिऐटली ही कार्यवाही केलेली आहे पंरतु आता तसे कोणतीही आणीबाणी राहिलेली नाही तरी माझे असे मत आहे मॅडम की आपण जो निर्णय घेतलेला होता 3 महिन्याचा आता तर 3 महिने पुर्ण झालेली आहेत आता ही सिक्युरीटी डिस्कंटीन्यु करावी. प्रशासनाने महासभे समोर हे धोरण ठरविण्याचा अधिकार महासभेला असल्यामुळे तो प्रस्ताव सादर करावा. नंबर 3 की महापालिकेच्या ऑडिट डिपार्टमेंटने, लॉ डिपार्टमेंटने त्यांना सांगितले होते की अनामत रक्कम बँक गॅरंटी किंवा डी.डी. घेणे उचित राहील तर त्याची कार्यवाही का नाही केली ह्या तीन चार गोष्टींचा उहापोह करणे मॅडम गरजेचे आहे. म्हणून माझी तुम्हाला विनंती आहे की आपण कृपया प्रशासनाला माझ्या प्रश्नांची उत्तरे देण्यास सांगावे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य जयेश भोईरजी तुम्ही बोला.

जयेश भोईर :-

धंन्यवाद मॅडम, आता गेल्या वेळी आपली 60 लोक कमी केली होती सिक्युरीटी गार्ड मधुन तर त्यांच्या बदली आता नविन कुठले तरी टेंडर काढून भरती केलेली आहे का? आपल्या सेक्युरीटी गार्डमध्ये आपली स्थानिक लोक होती 60 लोक आमच्या वॉर्डातील होते राई, मुर्धा, मोर्वा, या गावातली लोक होती त्यांना तात्काळ काढून टाकण्यात आले होते. त्याच्या जागेवर दुसरी आता बाहेरची भरती केलेली आहेत हे का? त्यांना भरती करण्याच्या अगोदर आमचे स्थानिक जे काढलेले आहेत त्यांनाच भरती करावे अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर :-

तुमच्या प्रश्नाचे उत्तर मिळेल. सन्मा. सदस्या शानु गोईल मॅडम आपण बोला.

शानु गोहिल :-

मॅडम, मला कोरोना विषया बद्दल बोलायचे होते सध्या नाही बोलायचे आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे. अजुन कोणाला ह्या विषयावरती बोलायचे आहे का?

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, आता ध्रुवकिशोरने जो मुद्दा मांडला कारणकी आता सत्ताधारीचे ते सदस्य आहेत म्हणजे खरोखर त्यांचे मत काय आहे प्रशासनाने काय केले पाहिजे? आयुक्त महोदयाने हा विषय मान्यतेसाठी महासभे समोर ठेवायचा की अवलोकनाचा म्हणजे ज्या पध्दतीने आयुक्ताने आपल्या समोर पाठवले त्याची सरासरी मान्यता ते घेत आहेत. त्याला विरोध आहे की तुम्हाला हा परत विषय महासभे समोर आणा हा असा विषय आहे रितसर काणर मला वाटते हा गोषवारा जो त्यांनी दिलेला आहे तो परिपुर्ण गोषवारा आहे. ह्या पालिकेमध्ये 982 सुरक्षा रक्षकांची गरज लागते. खरोखर एवढे आयुक्त साहेब 982 म्हणजे यांचा तुम्ही अंदाज पकडला तर 12.5 कोटी रुपये खर्च म्हणजे ह्या सिक्युरीटी कार्पोरेशनची लोक त्यांचे जे वेतन आहे 23 हजार रुपये ह्या अनुषंगाने आपण त्याची बेरीज करा अंदाजे 12 ते 12.5 कोटी रुपये खर्च येतो. ठिक आहे सध्या ते नियुक्त करण्यात आलेले आहेत त्याला कारण डी.सी.एच., डी.सी.सी.एच., सी.सी.सी., डी.सी.एच.सी. ह्या सेंटर केंद्रामध्ये सुरक्षा व्यवस्थित रहावी नियोजन व्यवस्थित राहावे न्याय व्यवस्था मेंटेन रहावी त्याच्या साठी तुम्ही ही भुमिका साहेब घेतलेली होती. आणि पालिकेच्या दृष्टीकोणातुन ही काय चुकीची भुमिका नव्हती. तसेच याच्यामध्ये तुमच्या गोषवाऱ्यामध्ये एक वाक्य नमुद आहे म्हणजे महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी कार्पोरेशन कप परळ यांनी त्याच्याकडील माहिती पुस्तके सोबत महाराष्ट्र शासन राज्य पत्र म्हणजे हा शासनाचा निर्णयच झाला दि. 19/04/2010 रोजी प्रसिध्द झालेली अधिसुचना जोडलेली असुन त्यामध्ये अनुक्रमांक 15 मध्ये पुर्वी प्रमाणे नमुद आहे की स्टेट गोव्हर्नमेंट ऑफिसेस ऑर्गनाईजेशन आणि पब्लिक सेक्टर अंडर टेकिंग ऑफ द स्टेट गव्हर्नमेंट कॅन बी मँडेटेड टू टेक सिक्युरीटी फ्रॉम द कार्पोरेशन. म्हणजे मँडीटेडचा अर्थ महापौर मॅडम तुम्हाला तो आदेश आहे. तो आदेशच झाला की तुम्हाला ते त्यांच्याकडून घ्यायचे आहे. आता आयुक्त महोदयांनी हे 3 महिन्याचा एक वर्ष केला किंवा पुढे तसेच धोरण ठरवणार आहेत. मला वाटते आयुक्तांनी त्यांचे निवेदन करावे. ठिक आहे खर्च जास्त आहे आयुक्त महोदय त्याला कसा आटोक्यात करुन कसा कमी करता येईल त्याच्या वरती आपल्याला खरतर त्याचे नियोजन व्यवस्थित करायला पाहिजे. पालिकेच्या आवारात बघा तिथे प्रत्येक पदाधिकाऱ्याला एक सिक्युरीटी ऑफिसर तुम्ही दिलेला आहे साहेब मला तर ऐके फोटी सेवन वाला पाहिजे माझा तर जीवावर बेतलेले आहे. तर साहेब असे तुम्हाला कुठून तुम्हाला कसं कमी करता येईल ते करुन ही संख्या कमी करुन हा खर्च कमी करुन तुमचा हा एक्सपटी याच्यामध्ये तुम्हाला साहेब दाखववी लागेल. महापौर मॅडम हे स्पष्ट मत आहे म्हणजे आयुक्तांनी त्याचा निवेदन करावे सभागृहाच्या समोर.

ध्रुवकिशोर पाटील :-

तुमचे झाले का जुबेरजी?

जुबेर इनामदार :-

धुवजी प्रशासनाला उत्तर देवू द्याना.

ध्रुवकिशोर पाटील :-

आपने जो बोला है वो क्या गलत है मे आपको बोल रहा हूँ पहिली बात तो यह है की यह जो सिक्युरीटी फोर्स का हम विरोध नही कर रहे है हम प्रशासनकी जो गलती क्या है वो हमने पॉईंट आऊट किया हूवा है । नंबर एक अभी आपने जो पॉईंट दिया है ........ जे राजपत्र आहे त्याच्या मध्ये लिहीलेले आहे की मॅडेटेड टू टेक सिक्युरीटी फ्रॉम द कार्पोरेशन दिस इस अ रॉंग नॉट मॅडेटेड हे

कम्पलसरी नाही यह हमारी इच्छाके उपर डिपेंड है । और वो भी महापालिकेने उनको पत्र दिया और उनकी सिक्युरीटी ली है । ऐसी और भी बहूत सारी कार्पोरेशन है वहापर यह सिक्युरीटी फोर्स नही है । नंबर एक नंबर दो, आपने जब वो पढा उसके निचेभी उसने लिखा हूवा है, क्या लिखा हूवा है की महाराष्ट्र सिक्युरीटी कार्पोरेशन यांच्या मार्फत पुरवठा करण्यात येत असलेला सुरक्षा रक्षक यांना विषेश पोलीस अधिकारी म्हणुन मुंबई पोलीस कायदा 1951 चे कलम 21 अंतर्गत एम.एस.एफ. सुरक्षा रक्षक यांना विषेश पोलीस अधिकारी असे समजण्यात यावे. आपके पास गुगल है उस गुगल मे डाऊनलोड करो और देखो यह मेने डाऊनलोड किया हूवा है मे आपको बता रहा हूँ पढके बता रहा हूँ 21/01 आयुक्तास म्हणजे कोणाला पोलीस आयुक्तास किंवा राज्य शासनाने याबाबतीत विशेष रित्या अधिकार दिलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास आपल्या प्रभावा खाली येणाऱ्या हद्दीत कोणताही दंगा किंवा गंभीर स्वरुप पहाता शांतता भंग होण्याची भिती आहे असे वाटत असेल आणि नेहमीचे पोलीस दल रहिवाशांचे संरक्षण करण्यासाठी व मालमत्तेच्या संरक्षणासाठी पुरेसे नाही असे त्याचे मत होईल तेव्हा त्यास कोणत्याही वेळी स्व:तच्या सहीनिशी व शिक्यानिधी दिलेल्या आदेशा द्वारे पोलीस दलास कोणत्याही प्रसंगी मदत करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा 18 ते 50 वर्ष वयाच्या कोणत्याही धडधाकट पुरुषाची विशेष पोलीस अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येईल. असा 31/01 चा क्लॉज आहे. आणि गोषवाऱ्यामध्ये दिलेला आहे की महाराष्ट्र सिक्युरीटी कार्पोरेशन यांना विशेष पोलीस अधिकारी दर्जा दिलेला आहे. हा गोषवारा चुकीचा आहे. हे प्रतिवृत्त चुकीचे आहे असा माझा आरोप आहे. आपल्या विधी विभागाने आणि ऑडिटने पण लिहीलेले आहे की तीन महिन्याचे वेतन अग्रीम आम्हाला ठेवावे लागणार असल्याने आपल्याकडे सुरक्षा अनामत पोटी बँक गॅरंटी घेणे आवश्यक आहे. परंतु प्रशासनाने त्याची अंमलबजावणी केली नाही. कोणत्या विधी अधिकाऱ्याचा किंवा ऑडिट डिपार्टमेंटचा जर निगेटीव्ह रिपोर्ट असेल तर कोणतेही देयक अदा होत नाही आणि कोणतेही काम होत नाही असे असताना यांच्याकडे 3-3, 4-4 महिन्याचे ॲडव्हान्स बिले कसे गेले? नंबर दोन, धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार महासभेचा आहे मग महासभेच्या अधिकारा वरती गदा आणलेली आहे. नंबर चार, सर्व पक्षीय गटनेत्यांची बैठक महापौरांच्या अध्यक्षतेखाली झालेली होती तेव्हा आपण त्यांना तात्पुरत्या स्वरुवातच परमिशन दिलेले होते. जर त्यांना एक वर्षाचे घ्यायचे होते तर त्यांनी तो विषय पुन्हा महासभेत आणायला पाहिजे होता किंवा आपल्या निदर्शनास आणायला पाहिजे होता परंतु त्यांनी ते केले नाही. मी फक्त प्रशासनाची इरेक्युरीटीस आहे ती इरेक्युरीटीस आपल्या निदर्शनास आणुन दिलेली आहे. आणि याच्यामध्ये गोषवाऱ्यामध्ये जे नमुद आहे ते चुकीचे आहे हे मी आपणास निदर्शनास आणुन दिलेले आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे तुम्हाला सगळ्यांची उत्तर आयुक्त महोदय देतील. आता मनोज दुबेजी बोला.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम एका विषयामध्ये आयुक्त महोदय उत्तर देताना साहेब आणीबाणीची परिस्थिती संपली का? तुमचे अधिकार शासनाने परत घेतले का कोविड काळात, त्याचेही उत्तर सोबत द्या.

मा. महापौर :-

सन्मा सदस्य अजित पाटीलजी बोला.

अजित पाटील :-

महापौर मॅडम मला बोलायला दिल्या बद्दल धंन्यवाद, हा जो विषय आहे सिक्युरीटी घेण्या बद्दलचा अत्यावश्यक बाबीसाठी जे सिक्युरीटी घेतलेली आहे ती ठिक आहे. परंतु यापुढे परिस्थिती

निर्माण होईल त्यावेळेला महापालिकेचा आकृतीबंध मंजुर झालेला आहे आणि आकृतीबंधामध्ये ती मंजुर.........................

निलम ढवण :-

महापौर मॅडम, ज्या उद्देशाने आपण ही सिक्युरीटी घेतली आहे ह्या सिक्युरीटीचा फायदा ॲक्युअली हे अनोळखी असल्यामुळे ठिक आहे थोड शिस्तीमध्ये काम होत आहे परंतु काही वेळा आपले लोकच त्यांना सपोर्ट करत नाहीत. आपण बऱ्याच वेळा बऱ्याच गोष्टी इथे आपण ठरवतो. परंतु त्या अंमलात येत नाहीत. आपण बाहेर समोर गाड्या लावायच्या नाहीत, गाड्या लावण्यासाठी तिकडे आपण जागा दिलेली आहे. परंतु काही लोक जबरदस्तीने तिथे लावतात त्या सिक्युरीटींचे ऐकत नाहीत. आणि अशा बऱ्याच गोष्टी घडतात. सिक्युरीटी आपण बाहेर ठेवली आहे असे प्रसंग असे बऱ्याच वेळा आपल्यावर आलेले आहेत आणि त्यानंतर थोडीशी सिक्युरीटी टाईट करण्याचे किंवा सर्वांना संरक्षण देण्यासाठी महानगरपालिकेला पण संरक्षण किंवा तिथले कर्मचारी/अधिकारी आपण सर्व नगरसेवक आहोत अशा पध्दतीने संरक्षण देण्यासाठी ही सिक्युरीटी आपण घेतोय परंतु पुन्हा नविन आता जर आपण हा पुन्हा बदल केला काही गोष्टी आपल्या याच्यानुसार धोरण वेगवेगळे बदलत राहिलोत तर नक्कीच हे प्रसंग जर पुन्हा आल्या नंतर पुन्हा आपण सिक्युरीटीचे हे करणार का? तर आहे त्या याच्यात काही प्रश्न जे ध्रुवकिशोर पाटीलने जे उपस्थित केले आहेत त्याची उत्तरे मा. आयुक्त साहेब देतीलच परंतु जी सिक्युरीटी आहे त्या याच्यामध्ये काही तत्वशा बदल करुन आपण ती सिक्युरीटी ठेवावी. जेणेकरुन त्याचा फायदा आपल्या लोकांना कारण ऐरवी जे सिक्युरीट असतात तर त्यांना ओळखीचे असल्यामुळे कसेही येतात कसेही जातात कुठच्याही गोष्टीची अंमलबजावणी होत नाही त्यामुळे आपण ह्या गोष्टीचा देखील विचार करावा आयुक्त साहेब आपले मत आपण द्यावे आणि त्यासंदर्भातले जे काही तृटी असतील त्या तृटी वगळून आपण ही सिक्युरीटी ठेवण्यात यावी अशी मी विनंती करते.

मा. महापौर :-

ठिक आहे, विना हत्यारी पुरुष व महिला सुरक्षा रक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी कार्पोरेशन यांच्याकडून पाठवूरावा करणे संदर्भामध्ये आयुक्ताने प्रतिवृत्त महासभेला सादर केलेले आहे. ह्यावरती सन्मा. नगरसेवकांनी चर्चा केलेली आहे काही प्रश्नाचा खुलासा मा. आयुक्तांकडून त्यांनी अपेक्षित केलेला आहे. तरी आयुक्त महोदयांनी त्याचा खुलासा करावा.

मारुती गायकवाड :-

सन्मा. महापौर महोदय, सन्मा. आयुक्त महोदय सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याअनुषंगाने मी खुलासा देतोय. मुळात महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी फोर्स किंवा महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी कार्पोरेशन हे विधीमंडळाने कायदा करुन निर्माण झालेले आहे. त्यामुळे ते गव्हर्नमेंट सिक्युरीटी आहे. दुसरा मुद्दा असा आहे की तो कुणा कुणाला मँडेटरी आहे कोणी कोणी कंम्पलसरी ती सिक्युरीटी फोर्स घ्यावी हे तो कायदा करताना गव्हर्नमेंटने क्यिलर केलेले आहे. त्यामध्ये सन्मा. सदस्य् जुबेर भाईंनी म्हटल्या प्रमाणे दि स्टेट गव्हर्नमेंट ऑफीसेस, ऑर्गनाईजेशन, अँड पब्लिक सेक्टर अंडरटेकिंग, ऑफ दि स्टेट गर्व्हनमेंट शाल बी मँडेटेड टू टेक सिक्युरीटी फ्रॉम दि कार्पोरेशन तिसरा मुद्दा मॅडम सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी जो उपस्थित केला होता की ते डिपॉझिट कसे घेतले किंवा काय घेतले ज्यावेळेस एखादी कार्पोरेशन किंवा ज्यावेळेस एखादे संस्था किंवा गव्हर्नमेंट स्थापन करते किंवा गव्हर्नमेंटच्या कायद्याने ते निर्माण होते त्यावेळेस त्या प्रत्येक संस्थेची किंवा त्या मंडळाची कार्यपध्दत निश्चित होते. आणि त्या कार्यपध्दतीमध्ये महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी फोर्सच्या कार्यपध्दतीमध्ये सिक्युरीटी फोर्स जर घ्यायची असेल तर दे शाल डिपॉझीट अमाऊंट इक्वल टू थ्री मंथ

ऑफ अॅव्हरेज मंथली बिलींग ऑफ द फॉर एम.एस.एफ. इंडक्शन अॅस सिक्युरीटी डिपॉझीट. सिक्युरीटी घ्यायची असताना त्यांना तीन महिन्याचे डिपॉझीट देणे बंधनकारकच आहे मॅडम. त्यामुळे प्रशासनाने केलेली कार्यवाही ही योग्य कार्यवाही केलेली आहे. दुसरा मुद्दा सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब म्हटले की अशी कोणती आणीबाणी होती किंवा त्या याच्यामध्ये ही सिक्युरीटी घेतली तर पेंड्यामिक अॅक्ट 1897 च्या अनुषंगाने जी कोविड मुळे देशामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली ती वैद्यकिय आणीबाणीच होती एक प्रकारची आणि त्या अनुषंगाने त्यावेळची एमर्जन्सी लक्षात घेऊन सन्मा. आयुकत महोदयांनी त्यांना प्राप्त अधिकारात 67 (3) (क) नुसार ती सिक्युरीटी मॅडम घेतलेली आहे. आणि ती सिक्युरीटी ज्यावेळेस घेतली नाही असी व्हेक्स सेक्युरीटी न घेता त्या महाराष्ट्र सिक्युरीटी फोर्स किंवा महाराष्ट्र सिक्युरीटी फोर्स कार्पोरेशनने महापालिकेच्या सर्व पॉईंटला किंवा महापालिकेच्या जेवढ्या मालमत्ता असतील डी.सी.एच. च्या असेल म्हणजे आपले दवाखाने असतील, आपले गार्डन असतील, बाकिच्या मालमत्ता असतील त्या मालमत्तांचे प्रॉपर सर्व्हे करुन आपणाला किती गार्ड आवश्यक आहेत ते आपल्या प्रशासना समोर तो डेटा ठेवल्या नंतरच तो निर्णय घेतलेला आहे मॅडम. त्यामुळे जवळ पास त्यांनी 750 चा जवळपास डेटा दिला होता तरी सुध्दा आपण 750 न घेता जेवढे आवश्यक आहेत जेवढी एमर्जन्सी आपणाला गरजेची आहे तेवढीच आपण 246 लोक फक्त आपण महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी फोर्सचे आपण घेतलेली आहेत. दुसरा मुद्दा मॅडम एकुण आपण आता सध्यस्थितीमध्ये आपल्याकडे 940 सिक्युरीटी आहेत पैकी 246 एम.एस.एफ. चे सिक्युरीटी आहेत आणि 694 स्थानिक म्हणजे प्राईव्हेट सैनिक सिक्युरीटी आहेत. आणि जे मॅडम आपण त्यांना डिपॉझीट दिलेले आहे तीन महिन्याचे ते डिपॉझीट आतापर्यंत आपण ते वसुल झालेले आहे पेमेंट मधुन त्यामुळे त्यांच्याकडे आता कोणतेही डिपॉझीटच्या माध्यमातुन त्यांच्याकडे शिल्लक नाही. आतापर्यंत तीन महिन्यामध्ये तेच डिपॉझीट त्यांना एम.एस.एफ. ला दिलेले होते त्या डिपॉझीटच्या त्यातुन आपला जो पेमेंट आहे तो पेमेंटचा खर्च वजा करुन ते डिपॉझीट आता निल झालेले आहे.

निलम ढवण :-

सर पण मगाशी ह्यांनी काहीतरी माहिती दिली ध्रुवकिशोर सरांनी की तीन महिन्याचे डिपॉझीट आणि तीन महिन्याचा पगार आपण अॅडव्हान्स देत आहोत.

मारुती गायकवाड :-

नाही मॅडम, आपण तीन महिन्याचा पगारच डिपॉझीट पोटी दिलेला आहे अॅडव्हान्स. तीन महिन्याचे डिपॉझीट वेगळ आणि परत तीन महिन्याचा पगार वेगळा असे डिपॉझीट केलेले नाही मॅडम आपण तीन महिन्याचा पगार डिपॉझीट पोटी आपण त्याठिकाणी दिलेला आहे.

निलम ढवण :-

मगाशी ती माहिती थोडी चुकिची होती.

जुबेर इनामदार :-

पगाराच्या सोबत बँक डिपॉझीट देता येत नाही विषय संपला.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील तुम्हाला पडलेल्या कोढ्याचे उत्तर मिळाले का?

ध्रुवकिशोर पाटील :-

नाही मॅडम,

मा. महापौर :-

अजुन काय उत्तर अपेक्षित आहे?

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, गायकवाड साहेबांनी माहिती दिलेली आहे परंतु थोडीशी चुकिची आहे. जे 19/04 चे जे राजपत्र आहे त्याच्यात 15/1 चा जो अनुक्रमांक आहे ती राजपत्राची तुम्ही कॉपी द्या त्याच्यामध्ये साहेब म्हटलेले आहे की मँडेट नाही. इस अव्हर विश आमच्या इच्छेनुसार ते अपलंबुन आहे. नंबर दोन तुम्ही जे म्हणतात की डिपॉझीट तीन महिन्याचे सॅलरी आपण जमा केली आहे आणि एक महिन्याची सॅलरी आपण डिपॉझीट ठेवलेली आहे. तुम्ही म्हणतात की ती वरती आली आहेत तर ती वरती कशी आली याचा खुलासा करावा. नंबर दोन आपल्या ऑडिटरने आणि लॉ डिपार्टमेंटने असे म्हटलेले आहे की आपण त्यांच्याकडून बँक गॅरंटी घ्यावी तर ती का नाही घेतली तो एक खुलासा होता. नंबर दोन की आम्ही असे नाही म्हटले की अशी कोणती आणीबाणी होती तुम्ही घेतले ते बरोबर घेतले आहेत त्याबद्दल वाद नाही ते घ्यायला पाहिजे परंतु आमचे असे म्हणणे होते की आता कोविड जवळ जवळ संपलेला आहे. आता 67 (3) (क) चा जो कायदा आहे तो जर वापरला नाही तरी चालेल तुम्ही विषय आमच्या महासभेपुढे आणावा आम्ही धोरणात्मक निर्णय घेऊ की आम्हाला महाराष्ट्र सिक्युरीटी फोर्स ची आवश्यकता आहे किंवा प्रायव्हेट सिक्युरीटी फोर्सची आवश्यकता आहे तुमचे जे काही म्हणणे असेल तो निर्णय घ्यायचा अधिकार महासभेचा आहे. त्याच्यामुळे तो निर्णय आम्ही घेणार आहोत. तुम्ही तो प्रस्ताव आम्हाला सादर करा. आम्ही फक्त तुम्हाला तात्पुरत्या तीन महिन्यांची परवानगी दिली होती महापौर मॅडम तुम्हाला आठवत असेल तुमच्याच अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय गटनेत्यांची आपण बैठक ठेवलेली होती. त्या मिटींगमध्ये आपण निर्णय घेतला होता तीन महिन्या करीता तात्पुरती मग हा एक वर्ष घ्यायची गरज नव्हती आमच्या डिसीजनला प्रशासनाने म्हणजे आमच्या ठरावाची अंमलबजावणी केली नाही किंवा आमच्या डिसीजनची अंमलबजावणी केली नाही तीन महिन्याचे सरळ तुम्ही एक वर्ष केले आहे. ती एक क्वेरी होती. परत आम्ही तुम्हाला सांगितले की डिपॉझीट तीन महिने प्लस एक महिने असे चार महिने तुम्ही आता असे सांगितले की तीन महिने ते आम्ही त्या पगारामधुन ॲगजस्ट केले ते कसे ॲगजस्ट केले ते तुम्ही सांगा. आणि तुम्ही जे म्हणतात विशेष अधिकार पोलीसात दिलेला आहे ॲसपर 1951 कलम 21 अन्वये ते तुम्ही वाचा त्याच्यामध्ये कोणालाच एस.पी. ला आणि पोलीस कमिश्नरला पॉवर आहे की त्यांना वाटेल त्या व्यक्तिला ते विषेश पोलीसाचा अधिकार देवू शकतात. असे त्याच्यामध्ये नमुद आहे. कोणतेही एम.एस.एफ. दिलेले नाही. आणि त्याचे तुम्हाला एक ऑडिट आणि लॉ ची करणे बाकी आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, सन्मा. ध्रुवजी आताचा जो विषय आहे आपण सांगितले कोविड पुरता 3 महिन्यासाठी आपण ही सिक्युरीटी घेतली होती. परंतु 3 महिन्या नंतर देखील काही हादसे आपल्या महानगरपालिकेत घडले होते.

ध्रुवकिशोर पाटील :-

तुम्ही बरोबर बोलले मी विसरो मॅडम तुम्ही आठवण मला चांगली करुन दिली. मॅडम ह्याच महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी बोर्डाचे जवान असताना खांबित साहेबांवरती जो अटॅक झाला होता ते मारेकरी आपल्या महापालिकेच्या आवारामध्ये फिरत होते सी.सी.टी.व्ही. मध्ये कैद झाले होते. आणि हे आपले महाराष्ट्र सिक्युरीटी फोर्सचे जवान तिथे उभे होते त्या सी.सी.टी.व्ही. मध्ये आले होते. मग तुम्ही मला सांगा जर एवढी चागली सिक्युरीटी होती मग त्यांनी ह्या लोकांना का नाही सस्पेन्समध्ये पकडले? किंवा त्यांनी ह्या लोकांना का नाही याच्यामध्ये पकडले?

निलम ढवण :-

साहेब तुमच्या निदर्शनास आणुन देवू इच्छीते की काही नगरसेवक देखील बंदुक लावून आपल्या महापालिकेत फिरत असतात. मग ते जर जबरदस्ती त्यांच्यावर करत असतील की मी

नगरसेवक आहे हे आहे ते आहे म्हणून आणि अशा पध्दतीने म्हणून मगाशी जो मुद्दा मी उपस्थिती केला की सिक्युरीटी जरी असली तरी त्या सिक्युरीटीचे ऐकले जात नाही मग त्यांना काय करायचे आपल्या लोकांनीच त्यांना सहकार्य करणे फार गरजेचे आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

शंभर टक्के तुम्ही बरोबर बोललात की आपल्या लोकांनी सहकार्य करणे गरजेचे आहे त्यामध्ये आमचे कुठलेही मत नाही आम्ही फक्त गोषवाऱ्यामध्ये असलेल्या ज्या चुका आहेत त्या फक्त निदर्शनास आणुन दिल्या मॅडम. आम्हाला काही प्रॉब्लेम नाही. सिक्युरीटी फोर्स हे चांगले काम करते आम्ही त्याचे सर्टिफिकेट देतोय परंतु तुम्ही मला सांगा मॅडम तुमच्या नगरसेवक पदाचा जो अधिकार आहे तो अधिकार दुसऱ्या कोणी वापरला तर तुम्हाला चालेल का? धोरणात्मक निर्णय घ्यायचा अधिकार महासभेचा आहे. त्यानी महासभेला दिला पाहिजे.

निलम ढवण :-

महासभेचा आहे परंतु जर सगळ चांगल्या पध्दतीने चालत असेल किंवा काही गोष्टींमुळे प्रॉब्लेम होत नसेल तर मग ते आपण त्याच्यावर मुद्दाम विषय का छेळायचा? महासभे समोर आणायची गरजच काय ?

मा. महापौर :-

ठिक् आहे सन्मा. आयुक्त महोदयांच्या तर्फे गायकवाड साहेबांनी इथे खुलासा दिलेला आहे. प्रशासनाने तीन महिन्याच्या मुदतीत विना हत्यारी पुरुष व महिला सुरक्षा रक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरीटी कार्पोरेशन यांच्याकडून पुरवठा करणे बाबत गटनेत्यांच्या बैठकीमध्ये आपण मंजुरी दिली होती परंतु याबाबत सतत नगरसेवकांच्या काही वेळेला तक्रारी माझा पर्यंत पण आलेल्या आहेत काही चर्चा सुध्दा नागरीकांमध्ये होऊन नागरीकही तक्रारी घेऊन माझ्याकडे आले होते. मला असे वाटते सध्याची सिक्युरीटी जी आपल्याला अपेक्षित आहे ती अजुन ह्यापुढे ठेवावी की नाही ठेवावी याकरीता मा. आयुक्त महोदय यांनी थेट प्रस्ताव महासभेला रितसर आणावा. असे मी ह्याठिकाणी ह्या प्रशासनाला आदेशित करत आहे. पुढचा विषय घ्या. विरोधी पक्षनेते बोला.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम, मुळात गायकवाड साहेबांनी जो खुलासा केलेला होता त्याच्यामध्ये एक महत्वाचे वाक्य बोलले की विधी मंडळाने केलेला कायदा त्याप्रमाणे आपण ती सिक्युरीटी ठेवलेली आहे. असे असताना रितसर कायदेशिर आजचा विषय आयुक्त साहेबांनी आपल्या समोर ठेवलेला आहे. आणि आता तो परत......................

मा. महापौर :-

विरोधी पक्षनेते त्यांनी प्रतिवृत्त सादर केलेले आहे आणि आपण जेव्हा बैठक घेतली होती त्यावेळेला आपण असे ठरवले होते की 3 महिन्याच्या मुदती पर्यंत आपण त्यांना मान्यता मंजुरी देत आहोत तुम्हाला आठवते की नाही आठवते पण मला चांगले आठवते की आपण तीन महिन्यासाठी आपण त्यांना मंजुरी दिली होती. तर आयुक्त महोदयांना सदर सिक्युरीटी पुन्हा ठेवायची आहे आपल्या पालिकेमध्ये किंवा आपल्या शहरामध्ये तर त्यांनी रितसर प्रस्ताव महासभेला आणावा आपण त्यांना मंजुरी देवू.

ध्रुवकिशोर पाटील :-

बरोबर आहे मॅडम.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 54, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्य क्षेत्रातील भाईंदर पश्चिम आरक्षण क्र.९१ स्टेडीयम (सुभाषचंद्र बोस मैदान) व भाईंदर उत्तन ३० मीटर रस्ता रुंदीकरणात बाधित होणारी जागा हस्तांतरणासाठी सॉल्ट विभागास "बंधपत्र" देणेबाबत.

प्रशांत दळवी :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर पश्चिम आरक्षण क्र.91 स्टेडीयमसाठी 18 हेक्टर क्षेत्र (मौजे भाईंदर सर्व्हे क्र.229पै, 230पै) राखीव असून सदर आरक्षणाच्या काही भागावर सुभाषचंद्र बोस मैदान अस्तित्वात आहे. सदर आरक्षणाची जागा सन 1994 मध्ये जिल्हाधिकारी ठाणे यांनी तत्कालिन नगरपरीषदेकडे हस्तांतर केली होती. तथापी याबाबत झालेल्या तक्रारीच्या अनुशंगाने सदर हस्तांतरणाचे आदेश रद्द करण्यात आले. तदनंतर सन 2010 मध्ये जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर जागा अतिक्रमणापासून संरक्षणासाठी महानगरपालिकेकडे सोपविलेली आहे. परंतु सदर जागेबाबत महसूल विभाग व सॉल्ट विभाग यांच्यात मालकी हक्काबाबत वाद असल्याने सदर जागा जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिकेस हस्तांतर केलेली नाही. सॉल्ट विभागाने सदर जागा हस्तांतरणासाठी रितसर प्रस्ताव पाठविणेबाबत कळविलेले आहे. त्याच प्रमाणे भाईंदर उत्तन रस्ता मंजूर विकास योजनेत 30 मीटर रुंदीचा दर्शविण्यात आलेला असून सदर रस्ता रुंदीकरणात खालील सॉल्ट विभागाच्या मालकीचे क्षेत्र बाधित होत आहे.

| Old Survey No. | New Survey No. | Village | Area (SMT) |
|---|---|---|---|
| 773 | 336 | Bhainder | 4525.00 |
| 757 | 230 | Bhainder | 20.00 |
| 722 A | 342 | Bhainder | 1019.00 |
| 4 | 6 | Murdha | 546.00 |
| 264 | 115 | Rai | 1838.00 |
| | 118 | | 294.00 |
| | 119 | | 95.00 |
| | 120 | | 220.00 |
| | 121 | | 78.00 |
| | 228 | | 3291.00 |
| 267 | 96 | | 536.00 |
| 259 | 106 | | 5819.00 |
| 218 | 36 | Tarodi | 394.00 |
| 217 | 37 | Tarodi | 2756.00 |
| 219 | 35 | Tarodi | 3732.00 |
| 222 | 12 | Dongri | 1977.00 |

वरील प्रमाणे आरक्षण क्र.91 व भाईंदर उत्तन रस्ता रुंदीकरणातील सॉल्ट विभागाच्या जागा महानगरपालिकेकडे विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात हस्तांतर करण्यासाठी महानगरपालिकेच्या शिफारसी वरुन नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सॉल्ट कमिशनर जयपूर यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. तथापी सॉल्ट विभागामार्फत विकास हक्क प्रमाणपत्राव्दारे जागा ताब्यात देण्याचा मुंबई महानगरपालिकेचा प्रस्ताव अमान्य केल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करता येत नसल्याने सदर प्रस्तावात नमूद सॉल्ट विभागाच्या जागा ताब्यात

घेण्यासाठी चालू बाजार भावानूसार महानगरपालिका मोबदला देण्यास तयार असलेबाबत तसेच सदर सॉल्ट विभागाच्या जागेवरील बाधित होणारे कामगारांचे पुर्नवसन, सदर जागा हस्तांतर केल्यास काही न्यायालयीन दावे झाल्यास त्याबाबतची जबाबदारी स्विकारल्यास तयार असल्याबाबतचे “बंधपत्र” राज्य शासनामार्फत सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

वरील प्रस्तावात नमूद भाईंदर पश्चिम स्टेडीयम आरक्षणाच्या जागेची रेडीरेकनर नूसार रु. 26.89 कोटी व भाईंदर उत्तन रस्ता रुंदीकरणात बाधित जागेची रेडीरेकनर नूसार रु.12.74 कोटी एवढी किंमत होत आहे. सदर जागा विना मोबदला देणेसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि केंद्र शासनाच्या मागणीनुसार सदर प्रस्तावात नमूद जागा ताब्यात घेण्यासाठी “बंधपत्र” देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भाईंदर पश्चिम रेल्वे समांतर मिरारोड स्टेशन पर्यंत जाणाऱ्या 30 मीटर रुंद रस्त्यात सॉल्ट विभागाची 32756.00 चौ.मीटर एवढी जागा जात आहे. सदर जागेची रेडीरेकनर नूसार रु.45.26 कोटी किंमत होत आहे. सॉल्ट विभागाच्या उपरोक्त काही जागांवर काही शेतकरी, मीठ पिकविणारे शिलोत्री यांनी आपला मालकी हक्क मागितल्यास व त्यांना मोबदला देण्याचे झाल्यास तो मोबदला सॉल्ट विभागाने द्यावा.

वरील वस्तुस्थितीप्रमाणे सॉल्ट विभागाची जागा ताब्यात घेण्यासाठी बंधपत्र देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वर्षा भानुषाली :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

जयेश भाईरजी आपण बोला.

जयेश भोईर :-

मॅडम गायकवाड साहेबांनी माझा प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. ते 60 स्थानिक लोकांची भरती केली आणि परत आता हे केले आहे.

मा. महापौर :-

गायकवाड साहेब कुठे गेले, ते परत येत आहेत तुम्ही ह्या विषयावरती बोला.

जयेश भोईर :-

सिक्युरीटी गार्डच्या विषया बद्दल मला उत्तर दिले गेले नाही.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम उप-आयुक्त येत आहेत तितपर्यंत पुढचा विषय घेण्यात यावा.

मा. महापौर :-

सॉल्टच्या विषयावर कोणाला बोलायचे आहे का ठराव वाचुन झालेला आहे. ठराव सर्वानुमते मंजुर.

प्रकरण क्र. 54 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्य क्षेत्रातील भाईंदर पश्चिम आरक्षण क्र.९१ स्टेडीयम (सुभाषचंद्र बोस मैदान) व भाईदर उत्तन ३० मीटर रस्ता रुंदीकरणात बाधित होणारी जागा हस्तांतरणासाठी सॉल्ट विभागास “बंधपत्र” देणेबाबत.

ठराव क्र. 49 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर पश्चिम आरक्षण क्र.91 स्टेडीयमसाठी 18 हेक्टर क्षेत्र (मौजे भाईंदर सर्व्हे क्र.229पै, 230पै) राखीव असून सदर आरक्षणाच्या

काही भागावर सुभाषचंद्र बोस मैदान अस्तित्वात आहे. सदर आरक्षणाची जागा सन 1994 मध्ये जिल्हाधिकारी ठाणे यांनी तत्कालिन नगरपरीषदेकडे हस्तांतर केली होती. तथापी याबाबत झालेल्या तक्रारीच्या अनुशंगाने सदर हस्तांतरणाचे आदेश रद्द करण्यात आले. तदनंतर सन 2010 मध्ये जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर जागा अतिक्रमणापासून संरक्षणासाठी महानगरपालिकेकडे सोपविलेली आहे. परंतु सदर जागेबाबत महसूल विभाग व सॉल्ट विभाग यांच्यात मालकी हक्काबाबत वाद असल्याने सदर जागा जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिकेस हस्तांतर केलेली नाही. सॉल्ट विभागाने सदर जागा हस्तांतरणासाठी रितसर प्रस्ताव पाठविणेबाबत कळविलेले आहे. त्याच प्रमाणे भाईंदर उत्तन रस्ता मंजूर विकास योजनेत 30 मीटर रुंदीचा दर्शविण्यात आलेला असून सदर रस्ता रुंदीकरणात खालील सॉल्ट विभागाच्या मालकीचे क्षेत्र बाधित होत आहे.

| Old Survey No. | New Survey No. | Village | Area (SMT) |
|---|---|---|---|
| 773 | 336 | Bhainder | 4525.00 |
| 757 | 230 | Bhainder | 20.00 |
| 722 A | 342 | Bhainder | 1019.00 |
| 4 | 6 | Murdha | 546.00 |
| 264 | 115 | Rai | 1838.00 |
| | 118 | | 294.00 |
| | 119 | | 95.00 |
| | 120 | | 220.00 |
| | 121 | | 78.00 |
| | 228 | | 3291.00 |
| 267 | 96 | | 536.00 |
| 259 | 106 | | 5819.00 |
| 218 | 36 | Tarodi | 394.00 |
| 217 | 37 | Tarodi | 2756.00 |
| 219 | 35 | Tarodi | 3732.00 |
| 222 | 12 | Dongri | 1977.00 |

वरील प्रमाणे आरक्षण क्र.91 व भाईंदर उत्तन रस्ता रुंदीकरणातील सॉल्ट विभागाच्या जागा महानगरपालिकेकडे विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात हस्तांतर करण्यासाठी महानगरपालिकेच्या शिफारसी वरुन नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सॉल्ट कमिशनर जयपूर यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. तथापी सॉल्ट विभागामार्फत विकास हक्क प्रमाणपत्राव्दारे जागा ताब्यात देण्याचा मुंबई महानगरपालिकेचा प्रस्ताव अमान्य केल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करता येत नसल्याने सदर प्रस्तावात नमूद सॉल्ट विभागाच्या जागा ताब्यात घेण्यासाठी चालू बाजार भावानूसार महानगरपालिका मोबदला देण्यास तयार असलेबाबत तसेच सदर सॉल्ट विभागाच्या जागेवरील बाधित होणारे कामगारांचे पुर्नवसन, सदर जागा हस्तांतर केल्यास काही न्यायालयीन दावे झाल्यास त्याबाबतची जबाबदारी स्विकारल्यास तयार असल्याबाबतचे “बंधपत्र” राज्य शासनामार्फत सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

वरील प्रस्तावात नमूद भाईंदर पश्चिम स्टेडीयम आरक्षणाच्या जागेची रेडीरेकनर नूसार रु. 26.89 कोटी व भाईंदर उत्तन रस्ता रुंदीकरणात बाधित जागेची रेडीरेकनर नूसार रु.12.74 कोटी

एवढी किंमत होत आहे. सदर जागा विना मोबदला देणेसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि केंद्र शासनाच्या मागणीनुसार सदर प्रस्तावात नमूद जागा ताब्यात घेण्यासाठी “बंधपत्र” देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भाईंदर पश्चिम रेल्वे समांतर मिरारोड स्टेशन पर्यंत जाणाऱ्या 30 मीटर रुंद रस्त्यात सॉल्ट विभागाची 32756.00 चौ.मीटर एवढी जागा जात आहे. सदर जागेची रेडीरेकनर नूसार रु.45.26 कोटी किंमत होत आहे. सॉल्ट विभागाच्या उपरोक्त काही जागांवर काही शेतकरी, मीठ पिकविणारे शिलोत्री यांनी आपला मालकी हक्क मागितल्यास व त्यांना मोबदला देण्याचे झाल्यास तो मोबदला सॉल्ट विभागाने द्यावा.

वरील वस्तुस्थितीप्रमाणे सॉल्ट विभागाची जागा ताब्यात घेण्यासाठी बंधपत्र देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी                अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 55, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तलावात बोटींग सेवा व मासे उत्पादनासाठी देण्याबाबत निर्णय घेणे.

सचिन म्हात्रे :-

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण 21 तलाव असुन सदर तलावापैकी 18 तलाव बांधुन त्या सभोवताली उद्यान विकसित करण्यात आलेले आहे. सर्वच तलावात बोटींग सेवा व मासे उत्पादन सुरु करणे शक्य नाही. प्रशासनाने सर्व तलावांचा अभ्यास करुन व माहिती घेवून ज्या तलावांमध्ये बोटींग व मासे उत्पादन शक्य होईल अशा तलावांमध्ये बोटींग सेवा सुरु करणे व मासे उत्पादन करुन त्याची विक्री करण्यासाठी तलाव ई-ऑक्शन पध्दतीने देणेस तसेच सदर सर्व तलावातील पाणी स्वच्छ राहण्यासाठी त्यामध्ये Paddle Wheel Areator (1HP) बसविणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

राकेश शहा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या प्रभात ताई तुम्ही बोला.

प्रभात पाटील :-

मॅडम, नमस्कार मी आयुक्त साहेबांना पत्र दिले होते की महानगरपालिका क्षेत्रातील जेवढे तलाव आहेत त्या तलावांमध्ये मासे सोडण्याचे प्रयोजन करा ते ऑक्शनने द्यायचे काम करा कारण सांगते, खुप वर्षा पासुन आपण ही प्रक्रिया बंद ठेवलेली आहे आपल्याकडे चालु होते मासे पकडण्यासाठी लोकांना आपण लिलाव पध्दतीने ते तलाव देत होतो. त्याच्यामुळे व्हायचे काय की पाणी स्वच्छ रहाते हे आपण लक्षात घेत नाही. आणि आपण ऑक्शनने दिल्यामुळे आपल्याला उत्पन्न पण मिळते आणि तलावाचे पाणी स्वच्छ राहते. आता हा ठराव झाला आहे मला असे वाटते की ठराव बरोबर केला आहे की पाहणी करा सगळ्याच तलावांना मासेमारी साठी देता येणार नाही पण त्याचे संरक्षण होणे आवश्यक आहे. आणि त्यानुसारच द्यावेत. त्याच्यामध्ये मला एक सांगण्याचा उद्देश असा

आहे की कोविड काळामध्ये कदाचित त्याच्या आधीच निर्णय झाला असेल की आपण बरेचशे तलाव जे आहेत ते विसरजनासाठी देतो शहरातील आणि देणे पण पाहिजे कारण सगळेच गणपती काय आपल्याला खाळीपर्यंत नेता येत नाहीत. असे करत असताना त्या तलावांची सुरक्षीतता म्हणा किंवा त्याची स्वच्छता म्हणा प्रशासनाने निर्णय घेतला की त्याचे आपण अर्धे अर्धे पार्ट करुया. मला सांगा काही तलाव खुप मोठे नाहीत की त्यांचे पार्ट करता येतील परंतु तरी प्रत्येक तलावाला पार्ट केला गेला आहे आणि आता त्या तलावांचे डबक झाले आहे. याचा एक दौरा व्हावा मॅडम आपण दौरा करावा प्रशासनाचे आपण प्रमुख आहात ह्या प्रत्येक तलावाचा दौरा करा आणि तलावांची साईज काय राहीली आहे ती बघा. सगळ्यात महत्वाचे म्हणजे शिवार उद्यानला जावून आवर्जुन बघा आपण म्हणतो की शहराचे नाक आहे आपल्या शहरातील सर्वात मोठे तलाव आहे आणि तिथे आपण म्हणजे वर्षानु वर्ष त्या महावीर वाल्याला आंधन केले आहे त्याच्यात आपण गमावले आहे सगळ महापालिकेची प्रतिष्ठाही गमावली आहे आणि पैसाही गमावला आहे. आणि आपले सत्वपण गमावले आहे हे माझे पुर्ण पणे प्रशासनावर आरोप आहे. त्या माणसाचे आपण काहीही करु शकत नाही. परंतु त्याच्यामध्ये दोन पार्ट करताना त्याचे काय डबक करुन ठेवलेले आहे एकदा जरुर बघावे. माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्ही एक व्हिजीट तिथे जरुर करा. आणि हा जो प्रश्न आहे तलावांचा बरेच तलाव सुशोभित नाहीत आणि सगळ्यात महत्वाचे सांगते तुम्हाला की आपण तलावांचे आयुक्त महोदयांनी आपल्याला तलावांच्या बाबतीत दोन वेळा प्रत्यक्ष भेटले पण. सगळ्यात महत्वाचे सांगते की आपण ऑक्शन करत नाही पण तिथे राई, मुर्धा, मोर्वा, आणि गावे जी आहेत नवघर म्हणा, गोडदेव, सगळेच सदस्य आहेत सगळेच सभासद आहेत मला कोणावर माझा आक्षेप नाही की त्यांनी कमावू नये परंतु आपण ऑक्शन करत नाही पण त्या गावातले स्थानिक लोक ऑक्शन करतात आणि तलाव देतात हे मोठी नामुष्कीची गोष्ट आहे आपल्यावर. त्यांना उद्योग मिळतो, धंदा मिळतो माझेही तेच म्हणणे आहे तुम्ही ऑक्शन करा. गावातले लोक का माझा तलाव म्हणून ऑक्शन करतात? माझ्या दोन तीन कल्पना आहेत आणि मी त्याच्या संदर्भात तुमच्याशी बोलले पण होते तर तुम्ही एकतर त्या तलावांची जे डबकी झाले आहेत ते डबकी काढून टाका तलावाचे स्वरुपच राहू द्या. सगळ्याच ठिकाणी गणपती विसर्जनाला परवानग्या पण देवू नका जिथे छोटे तलाव आहेत तिथे. आणि नक्कीच तुम्ही ऑक्शन करा कारण त्याच्यामुळे पालिकेला दोन पैशाचा फायदा होणार आहे आणि तलाव स्वच्छ राहणार आहेत. पाणी स्वच्छ राहणार आहे तलाव स्वच्छ पेक्षा पाणी स्वच्छ राहणार आहे. थँक्यु.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, अनिल सावंत यांना अनम्युट करा त्यांना ह्या विषयावर बोलायचे आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, धंन्यवाद, 79 क्वेअर किलो मीटरचे आपले हे शहर आहे. आणि त्याच्यामध्ये 21 तलाव आहेत. व्यवस्थित जर ह्या तलावांचे सुशोभिकरण झाले असते तर एक सीटी ऑफ लेग म्हणून ह्या शहराची ओळख झाली असती. प्रभात ताई बोलल्या ते बरोबर आहे. आज जवळ जवळ करोडो रुपये खर्च करुन काही तलावांमध्ये काँक्रीटची भिंत बांधलेली आहे तलावा मध्ये. कोणाच्या सुपीक डोक्यातुन ही कल्पना निघाली आणि डबकी करुन ठेवलेली आहेत. उच्च न्यायालयाचा हायकोर्टाचा निर्णय आहे 2013 चा पिटीशन क्रमांक 8713 पाणथळ संरक्षीत करा. आणि ही पाणथळ आहेत शिवार गार्डनचा जो तलाव आहे तो पाणथळ आहे तिथे संरक्षण भिंत टाकली करोडो रुपये खर्च करुन. आणि त्या तलावांची डबकी बणवली सुशोभिकरण सोडाच. आज सर्व ठिकाणी पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून शाळूच्या मातीचा मुर्तीसाठी आपण प्रोत्साहन देत आहोत महाराष्ट्र शासन प्रोत्साहन देत आहे आणि आपण तलावांमध्ये हे तलाव जे सुशोभीत आहेत त्यांची वाट लावलेली आहे. ज्या

अधिकाऱ्याने हे केले असेल जी कॉंक्रीटची भिंत त्याठिकाणी बांधली असेल करोडो रुपये त्यासाठी खर्च केलेले आहेत महासभेची मंजुरी नाही काही नाही ते सर्व त्या अधिकाऱ्याकडून रिकव्हर करा आणि सुशोभिकरण करुन घ्या त्या तलावांचे. ह्या शहराची एक ओळख राहूद्या एक चांगली ओळख राहू द्या ह्या शहराची. धंन्यवाद.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, म्हणजे हा विषय शेवटचा आजच्या पहिल्या सभेचा असल्यामुळे ॲडव्होकेट एस.ए. खान स्वीकृत नगरसेवक यांना एक आभाराचा ठराव मांडायचा आहे तर त्यांना ती संधी देण्यात यावी.

मा. महापौर :-

पहिला हा विषय संपु देत मग त्यांना संधी देते.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम हा विषय संपु द्या प्रशासनाने याच्यावर जरा बोलावे.

मा. महापौर :-

संबंधित विभागाचे अधिकारी कोण आहेत खांबित साहेब बोला. सन्मा. अनिल सावंत यांनी जो विषय मांडलेला आहे की तलावाच्या आतमध्ये आपण जी भिंत टाकलेली आहे तर त्याच्या संदर्भामध्ये जरा खुलासा करा.

दिपक खांबित :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की आपले जे 21 तलाव आहेत त्यामध्ये गणपती मुर्तीचे विसर्जन होत असल्यामुळे ते पाणी दुषीत होते त्यासाठी त्या तलावा मध्ये छोट्या कॉर्नरला भिंती घालुन विसर्जनाला वेगळीच जागा करायची म्हणून महासभेने मंजुरी दिली होती. आणि महासभेच्या मान्यते नंतर निविदा प्रक्रिया करुन आपण ते काम केले होते. परंतु आता जे बोलले शिवार गार्डनमध्ये मीही स्व:त बघितले तिकडे जी वॉल घातलेली आहे त्यामुळे जास्त जागा व्यापलेली आहे. त्याबाबत आम्ही पाहणी करुन योग्य ती कारवाई करतो. आणि बाकिच्या ठिकाणी असे काही दिसुन आलेले नाही. परंतु पुन्हा आम्ही एकदा बघुन घेऊ आणि जी काही आवश्यक उपाय योजना करायची आहे ती करुया साहेब.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम माझी आपणाला विनंती आहे ह्या शहराची ओळख तलावाचा लेक ऑफ सिटी म्हणुन राहू देत. ज्या ज्या ठिकाणी ह्या कॉंक्रीटच्या भिंती टाकलेल्या आहेत त्या सर्व काढून घ्याव्यात. कृत्रीम तलाव विसर्जनासाठी बनवावेत जसे महापालिकेने ह्यावेळी केले होते. आणि ह्या तलावांमध्ये विसर्जन न करता कृत्रीम तलावांमध्ये विसर्जन करावे. शाळुंच्या मुर्तीसाठी प्रोत्साहन द्यावे. ही आपणाला विनंती आहे आणि आयुक्तांना विनंती आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या तारा घतर मॅडम आपण बोला.

तारा घरत :-

गोडदेवच्या तलावात मी भिंत घालू दिली नाही. त्यावेळेला मला बरेच काही काही करण्यात आले. पण ते तलाव साफ पण करत नाही किती वर्ष झाली आपले तलाव साफ होत नाही. लिलाव तर झालाच पाहिजे. लिलावासाठी आम्ही बरेच काही केले पण तलाव साफ पण होत नाही ना. त्या भिंती बांधल्या त्याच्या आधी तलाव साफ करायला पाहिजे होती. तुम्ही मधुन भिंत बांधायला लावल्या ते तलाव साफ केली नाही ह्यांनी सांगितले की टेंडर आमचे असे नाहीत फक्त भिंत घालायची आहेत

साफसफाईचे टेंडर नाही. मग ते साफ नाही केले तर फायदा काय ती भिंत घालुन? ठेकेदार टेंडर घेतो परंतु ते साफ करतो की नाही ते पण बघितले पाहिजे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या गिता जैन मॅडम आपण बोला.

गिता जैन :-

मॅडम, धंन्यवाद, सर्व प्रथम हा विषय मी पण आयुक्त साहेबांना सांगितले होते की आपण खुप वर्षा आधी हे करायचे आणि आता आपल्याला ते करायला पाहिजे. ते आणले त्याबद्दल धन्यवाद. फक्त बाकीचे सगळे बोललेच आहे आणि सगळ्यांनी वेलकम केले हे विषय मला काही जास्त बोलायचे राहत नाही पण आपण जेव्हा ऑक्शन करतो तेव्हा अटी शर्तीमध्ये त्या तलावाची देखरेख काय स्टँडर्डने करावी म्हणजे फक्त देखरेख शब्द न टाकता काय स्टँडर्ड असायला पाहिजे, पाणी किती स्वच्छ असायला पाहिजे दर वेळी आपण चेक करायला पाहिजे. माशांचे बाकीचे सगळ जे त्यांना लागते तसे एक करायला पाहिजे तिथे ग्रीन जे ऐल्गी असते ते किती असेल त्यासाठी एक धोरण ठरवून आणि मग ते ऑक्शन करावे अशी माझी एक सुचना आहे. जेणे करुन जे तलावासाठी जे नेसेसरी बायोलॉजिकल वस्तु आहे ती तिथे रहावी हे त्यात नमुद करुन मगच ऑक्शन करावे जेणे करुन ते ऑक्शन करुन असे व्हायला नको की ह्यांनी केले नाही म्हणून परत तलावाची स्थिती तशीच होणार तसे होऊ नये म्हणून ऑक्शनमध्येच हे अटी शर्ती टाकून त्यांना राखरखाव त्यांची डेफ्थ हे सगळ नक्की करुनच त्यांना द्यावे अशी माझी एक सुचना आहे.

मा. महापौर :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 21 तलाव असुन ह्या तलावामध्ये बोटींग सेवा, मासे उत्पादन करणे करीता प्रशासनाने महासभेपुढे प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामध्ये नवघर, भाईंदर पुर्व, पेंकरपाडा, काशी जरीमरी तलाव, व इतर तलाव हे लहान आकाराचे असल्याने त्यामध्ये बोटींग चालवणे हे हिताचे होणार नाही म्हणून जे प्रशासनाने त्याठिकाणी नमुद केलेले आहे त्या तलावामध्ये बोटींग तसेच इतर तलावाचे लिलाव करण्याचा आता जो प्रस्ताव ह्या ठिकाणी ठराव मांडलेला आहे सचिन म्हात्रे यांनी हा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. आणि सन्मा. सदस्या, नगरसेवक यांनी ह्या ठिकाणी ज्या ज्या सुचना प्रशासनाला केलेल्या आहेत त्या सुचनांची अंमलबजावणी करण्यात यावी. आणि प्रशासनाला मी सुध्दा ह्या ठिकाणी सांगु इच्छीते की हे 21 तलाव आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रात आहेत ते सर्व तलाव साफ करण्यात यावेत. त्या सर्व तलावांचे सुशोभीकरण करण्यात यावे, नको असलेल्या भिंती गरज असेल तरच त्या भिंती ठेवाव्यात अन्यथा काढून टाकण्यात याव्यात. कारण आता तुम्ही ह्या वेळेला ज्या मुर्तींचे विसर्जन केलेले आहे त्यामध्ये तुम्हाला आढाळून आलं की त्याचा फायदा झाला आहे की नाही तेही पहावे. कारण मासे मरायचे ते तर मेलेलेच आहेत आम्ही स्व:त आमच्या जरीमरी तलावामध्ये पाहिले आहे की मासे दर वर्षी प्रमाणे मेलेले आहेत, पाणी घाण व्हायचे ते संपुर्ण पाणी घाण झालेलेच आहे. त्यामुळे ह्या सर्वाची नोंद घ्यावी. आणि पाणी स्वच्छ राहण्यासाठी जी प्रक्रिया प्रशासनाकडून करता येईल ती करावी. वास्तविक आपण गणेश उत्सव, नवरात्र उत्सव ह्या वेळेला नेहमीच तलावाला भिंती ज्या असतात त्याला कलरचे काम करतो, ग्रील ला कलरचे काम करतो, पण गेल्या ह्या दोन वर्षामध्ये कोरोना असल्यामुळे प्रशासनाने ह्याकडे लक्ष दिलेले नाही. परंतु आता छटपुजा ही जवळ येत आहे जर प्रशासनाला छटपुजेच्या आधी ज्या तलावाच्या शेजारी जर छटपुजा होत असेल त्या ठिकाणी कलर मारण्याचे काम किंवा ग्रील ला कलर मारण्याचे काम करता आले तर ते नक्की करावं. जेणे करुन मिरा भाईंदर क्षेत्रातील तलावाचे सुशोभिकरण वाढेल आणि आपल्या क्षेत्रामध्ये असलेल्या तलावांचे रक्षण करता येईल. सन्मा. सदस्य

ह्या ठिकाणचे जे जे आहेत त्यांनी जे जे सुचविलेले आहे त्यांचे विचार नक्कीच घ्यावेत. त्यांच्या सुचनांची अंमलबजावणी प्रशासनाने करावी. आजच्या सभेमध्ये एक विषय अजुन राहिलेला आहे तो विषय आपण घेऊया.

प्रकरण क्र. 55 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तलावात बोटींग सेवा व मासे उत्पादनासाठी देण्याबाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. 50 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण 21 तलाव असुन सदर तलावापैकी 18 तलाव बांधुन त्या सभोवताली उद्यान विकसित करण्यात आलेले आहे. सर्वच तलावात बोटींग सेवा व मासे उत्पादन सुरु करणे शक्य नाही. प्रशासनाने सर्व तलावांचा अभ्यास करुन व माहिती घेवून ज्या तलावांमध्ये बोटींग व मासे उत्पादन शक्य होईल अशा तलावांमध्ये बोटींग सेवा सुरु करणे व मासे उत्पादन करुन त्याची विक्री करण्यासाठी तलाव ई-ऑक्शन पध्दतीने देणेस तसेच सदर सर्व तलावातील पाणी स्वच्छ राहण्यासाठी त्यामध्ये Paddle Wheel Areator (1HP) बसविणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. सचिन म्हात्रे अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 56, प्रतिवृत्त सादर करणेबाबत. (वैद्यकीय आरोग्य विभाग)

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य भगवती शर्माजी आपण बोला.

भगवती शर्मा :-

यह विषय क्र.56 के अंदर मे मा. आयुक्त साहब के अंदर मे जोभी कोविड काल के अंदर मे खर्चा हूवा है सबसे पहला प्रश्न मेरा वही था की जैसे की आज देढ साल हो जाता है उसके बाद के अंदर मे खर्चेची पुरी तपशिल दि जा रही है । तो यह आगे नही होना चाहिये उसका आदेश आपने पहले भी किया है । अभी इन खर्चोके बारे मे मै महापौर मॅडम बोलना चाहता हूँ सर्व प्रथम यह ओम साई केअर प्रायव्हेट लिमिटेड को जो निविदा दि गई थी इसके अंदर मै यह लिखा गया की डी.सी.ए करीता ठाणे महानगरपालिकाने निविदा प्रक्रिया राबवून निश्चित केलेल्या दराने निवडीत केलेले ठेकेदार मेसर्स ओम साई आरोग्य केअर प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेने मान्यता. मेरा यह सबसे बडा कहना है की मॅडम एक तो हम जब कोईभी चिज के अंदरमे कंपेरिझन करते है तो ठाणा महानगरपालिका की नही करते है मुंबई महानगरपालिकाकी नही करते है । हम जैसे कल्याण डोंबिवली, भिवंडी, उल्हासगर हूई इस से तुलना करते है । क्योकी उनके बजेट मै उनके खर्चेमे हमारे कुछभी समानता रहती है । तो मेरा सबसे पढा आक्षेप यह है की उन्होने जो निविदा दी है इतनी बढी महानगरपालिका जिनका बजेट इतना बढा है उनके हिसाब से उनके ही दरके अंदर दिया है जोकी हमारे लिये बहुत जादा थी । तो इसके अंदर मे मेरा सबसे पहला आक्षेप यह है । दुसरा इसके अंदर मै इन्होने प्रती खाट के अंदर मै जो निविदा दी गई उस तक्ता के अंदर मै आप देखेंगे सबसे पहला तक्ता है की नोव्हेंब 2020 के

अंदर मै ऑक्सीजन 3204 और आय.सी.यु. 58 है इसका 38 लाख 86 हजार 138 रुपया पेमेंट किया गया । जब की ऑक्सीजन की रेट अलग थी आय.सी.यु. की रेट अलग थी । दोन्हो को मिक्स करकेही दिया गया है । अभी दोन्हो का एव्हरेज अगर देखा जाये तो 1 हजार 6 रुपया प्रती खाट हमको पडता है । जो की मेरे हिसाब से जो निविदा मे दिया गया उससे जादा लगता है । तो इस चार्ट के अंदर मे भी सबसे बढी गलती की गई की ऑक्सीजन की रेट क्या थी, आय.सी.यु. की रेट क्या थी उसके हिसाब के अंदर मै इन्होने तक्ते के अंदर मे सबसे बढी गलती की है । दुसरी मॅडम, जो इन्होने इसको निविदा दि गई है निविदा के अंदर मे क्लियर कट लिखा हूवा था की अगर 50 बेडका अगर यह मेन्टेन करेंगे तो उसके अंदर मे स्टाफ की क्या क्या रिक्वायरमेंट रहेगी जैसे कंसल्टंट आरमो डॉक्टर 6, नर्सेस 12, मल्टी परपस वर्कर 18, टेक्नीशियन 3, यह जो दिये गये है स्टाफ मॅडम उस हॉस्पीटल के अंदर मे इस ठेकेदार ने कही भी नही रखा जिसका समय समय पे मेने यहापे देखा है कई पत्रकार बंधुवोने भी आवाज उठाई थी इसके अंदर मे इनको ठेका दिया हूवा है उसके हिसाब से डॉक्टर, नर्सेस अव्हलेबल नही है । तभी इसी ठेकेदार द्वारा क्लेरिफिकेशन दिया गया था की मेरे पास के अंदर मे कोविड काल के अंदर मे स्टाफ नही मिल रहा है मै कोशीस कर रहा हूँ अॅक्जष्ठ करुंगा । जब की ओ नये अॅक्जस्ट किया ऐसेही चलाता रहा और उसको पुरा पेमेंट दिया गया । इसी तरीके से ऑक्सीजन सप्लाय, मेन पॉवर रिक्वायरमेंट के अंदर मे कंन्सलटंट 50 वाले के अंदर मे एक आर.एम.ओ. डॉक्टर-4, नर्सेस-8, मल्टी परपज वर्कर, अटेंडेंस-12, टेक्निशियन-3, यह सब कहीभी जो इसके अंदर मे अॅग्रीमेंट मे दिया गया है महापौर मॅडम उन्होने कहीभी पालन नही किया । आपको मे और बताना चाहता हूँ इनकी डिग्री क्या होनी चाहिये एम.डी. डी.एम. मेडिसेन, क्रिटीकल केअर, आय.डी.सी.सी.एम., एम.बी.बी.एस. डि.ए., एम.बी.बी.एस.डी.टी.सी. जितनेही इस अॅग्रीमेंट के अंदर मे महापौर मॅडम दिये गये है ऐसे कोई भी डॉक्टर वहापे नही गये थे । उसी के कारण से हमारे इस शहर के अंदर मे मृत्यु दर की वाढ हूई थी । सई ढंग से इलाज नही हो पाया था । तो मेरा आक्षेप है की इसके अंदर मे जो जो इनको पेमेंट दिया गया है मै पेमेंट के बारेमे भी बताऊंगा किस को कितना पेमेंट कैसे दिया गया है क्यो दिया गया । तो मेरा अनुरोध है महापौर मॅडम आपसे अब इन्होने पेमेंट तो दे दिया है लेकीन कहीना कही मेरा आक्षेप है सिधा की इसके अंदर मे घोटाला हूवा है । और इसकी एक थर्ड पार्टी ऑडिट किया जाना चाहिए । अभी मेरे सन्मा. सदस्य अनिल सावंत साहबनेभी एक पॉईंट उठाया था रेमडिसिवीर इंजेक्शन का, महापौर मॅडम, इसके अंदर मे नोव्हेंबर से मे के अंदर मे पॅरा माऊंट ऐंटरप्रायजेस को 6 करोड 11 लाख 1 हजार 293 रुपये का पेमेंट किया गया । उसके अंदर मे लिखा क्या गया है कोविड-19 दवाँई, रेमडिसिवीर, अँन्टीजन किड्स, सबको संमेलित इसलिए किया गया है की ओ रेमडिसिवीर इंजेक्शन का जो पेमेंट दिया गया वो छुट जाये । तो इसके अंदर मे मेरा सबसे बढा आरोप है यह जो परचेसजींग हूई है इसके अंदर मे इन्होने अलग अलग अमाऊंट दिही नही है । जिसके कारण से कोईभी सदस्य इसके अंदर मे समज नही पा रहा है की किस का कितना पेमेंट दिया गया है । अभी मे आपको संगणक चालक की संख्या हम महानगरपालिका मे संगणक चालको को क्या पेमेंट देते है महापौर मॅडम आपको मालूम है, अभी इन्होने तक्ता क्र.3 के अंदर मे संगणक चालक संख्या 28 नोव्हेंबर के अंदर मे 28 संगणक चालक को 21 हजार 144 रुपये हिसाब से पेमेंट दिया । डिसेंबर के अंदर मे 25 को 17 हजार 348 अंदर मे पेमेंट दिया । सबकी रेट देखा जाये तो सब अलग अलग दिखाई दे रही है । और सबसे बढी चिज एक और है महापौर मॅडम, इसके अंदर मे इन्होने 15 रुपया कॉल का कॉल क्या किया है उसके अंदर मे लिखा है होम आयसोलेटेड हाय रिस्क कोविड-19 व्यक्तीस संपर्क करुन आवश्यक वैद्यकिय सेवा संदेश पुरवणे कामी महापौर मॅडम आप पता करीये हर नगर सेवक यह बोल सकता है की ऐसे किसी मरीजो से इन्होने बादमे संपर्क

नही किया I लेकीन आकडा क्या दे दिया की इन्होने 2 लाख 21 हजार 992 कॉल की संख्या है और इनको 33 लाख 29 हजार रुपये पेमेंट दिया है I महापौर मॅडम मेरा सिधा सिधा आरोप है आक्षेप है की इनकी संपुर्ण थर्डपार्टी ऑडिट कराया जाना चाहिये ताकी पता चले की किस किस के अंदर मे किस किस अधिकारी किसके कर्मचारीने घोटाला किया है I समय समय पे हर सदस्यने इसके उपर मे आरोप लगाया है I फिर एक बार मै आपसे निवेदन करता हूँ की इसकी पुर्ण जाँच करवाँई जाये I

निलम ढवण :-

महापौर मॅडम, सन्मा. सदस्य भगवती शर्माजी यांनी जो विषय मांडला परंतु त्यालाच अनुसरुन एक विषय आहे जे पेमेंटमध्ये फायर ब्रिगेडमध्ये जे काम करत आहेत त्यांच्यामध्ये देखील त्यांच्या पगारामध्ये तफावत आहे. काल मी हा विषय सन्मा. म्हसाळ साहेब यांच्या निदर्शनास आणुन दिलेलाच आहे आणि ते म्हणाले आहेत त्या विषयावर मी माहिती घेतो म्हणून एकाच याच्यात काम करणाऱ्यांना वेगवेगळा पगार दिला जातो त्याची देखील चौकशी व्हावी.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, तोच विषय आहे दिढ वर्षा नंतर आलेल्या आमच्या हातामध्ये त्याच्यामध्ये आप्पा साहेब धर्माधिकारी जे कोविड सेंटर होते त्याच्यामध्ये जवळ जवळ 50 लाखाचा वर आपण पेमेंट केलेले आहे पुर्ण पिरेडमध्ये. पण त्या आप्पासाहेब धर्माधिकारी जे रुग्णालय होते ज्या संस्थेला दिले त्याने सोशल मिडियावर इतर ठिकाणी फ्री मध्ये मी करत आहे अशी बॅनरबाजी केली होती सोशल मेडियावर मेसेज टाकले होते की फ्री सर्व्हिस मी देत आहे महापालिकेच्या सहाय्याने आणि महापालिकेने 50 लाख रुपये त्याला दिलेले आहेत. ह्या विषयी आम्ही वारंवार स्थायी समितीमध्ये त्याविरोधात आवाज उठवला त्यावेळी आम्हाला सांगण्यात आले की त्याचे कुठचेही देयक दिलेले नाही मग इथे हे 50 लाख रुपये खर्च कशाचे दाखवत आहेत? त्याने पुर्ण सोशल मेडियावर टाकले होते की वन रुपीस क्लिनिक मी फ्री करत आहे महापालिकेच्या सहाय्याने. मग महापालिका का खर्च करत आहे ?

संदिप शिंदे :-

सन्मा. पिठासीन अधिकारी महोदया, सन्मा. सभागृह सन्मा. सदस्य सावंत साहेब आपण याबाबत स्थायी समितीवर सुध्दा सन्मा. उपमहापौर साहेबांनी हा विषय काढलेला होता वन रुपीस क्लिनिकचा जे आपल्याला ऑक्सीजन आणि आय.सी.यु. बेड साठी जे मनुष्यबळ उपलबध करुन दिले होते त्यांनी. जोपर्यंत स्थायी समितीवर ह्या विषयाचे पुर्ण शंका समाधान झाले नाही तोपर्यंत बील आपण अदा केलेले नव्हते. जेव्हा स्थायी समितीमध्ये त्यांनी लेखी स्वरुपामध्ये माफी सुध्दा मागितली होती आणि त्याने सोशल मेडियावर माफीचे पत्र पण टाकलेले होते. त्यानंतर मा. उपमहापौर महोदयाशी मी चर्चा केली आणि त्यानंतर त्याचे 25 लाख रुपये बील अदा केलेले आहे. हा जरी आपण तत्कालिन प्रतिवृत असल्यामुळे त्याच्यामध्ये त्याचा जो खर्च अपेक्षित होता तो आपण पाठविलेला असला तरी जोपर्यंत स्थायी समितीवर ह्या विषयावर चर्चा झाली होती तोपर्यंत आम्ही अदा केले नव्हते त्यानंतर त्याचे बिल अदा केलेले आहे.

मा. महापौर :-

25 लाखाची एकदम वाढ कशी काय झाली?

मा. उपमहापौर :-

जिस तरीके से सावंत साहब ने प्रश्न किया उनका प्रश्न अलग था और शिंदे साहब आपका जवाब अलग था, वापीस से उनका कहना यह था जहा तक मै सावंत साहब की बात समजा हूँ की उन्होने मेडिया मे यह घोषीत किया की हम वन रुपीस क्लिनीक के द्वारा लोगो को मोफत सेवाये

देंगे तो अगर लोगो को मोफत सेवाये उन्होने जाहिर तौर पे सोशल मेडिया मै अपने ट्वीटर पे जाहिर किया था तो फिर महानगरपालिका को पैसे देने की जरुरत क्यो पडी? सावंत साहब आपका सवाल यही है ना?

अनिल सावंत :-

माझा प्रश्न तोच होता.

मा. उपमहापौर :-

त्याने जाहिर केले होते की आम्ही आपल्या मार्फत एम.बी.एम.सी. तर्फे आणि मी मी म्हणजे तो स्व:त वन रुपीस क्लिनीक आम्ही लोकांना मोफत सेवा देणार आहोत आणि त्याने जाहिर केले होते सोशल मेडियामध्ये पण ट्वीटरमध्ये पण आणि स्पेशली प्रेसमध्ये पण तर महापालिकेला त्याला पैसे देण्याची गरज का झाली?

संदिप शिंदे :-

सन्मा. पिठासीन अधिकारी महोदया याबाबत आपण त्यांना नोंटीस पण इश्यु केली होती की तुम्ही अशा प्रकारचे काही सोशल मेडियावर तुम्ही प्रसिध्द केले होते का म्हणून नोंटीशी नंतर त्याचा खुलासा प्राप्त झाला त्या खुलाशावर आपण प्रॉपर मान्यता घेऊन त्याने परत टाकले सोशल मेडियावर की अशा प्रकारचा उल्लेख केला नव्हता की मी मोफत सेवा देणार आहे महापालिका मोफत सेवा देणार आहे त्याच्या बदल्यात मला त्याचे मानधन मिळाले आहे. अशा प्रकारे त्याने आपल्याकडे लेखी स्पष्टीकरण दिले. त्याच्या नंतर आपण मान्यता घेऊन त्याचे उर्वरित पेमेंट होते ते आपण अदा केलेले आहे. त्याच्या बाबत त्याने जाहिर माफी पण मागितलेली आहे की असा माझा उद्देश नव्हता आणि मी तसे वाक्य जे होते तसे टाकलेले नव्हते महापालिकेने मोफत सेवा दिली त्याच्या बदल्यात मला मानधन मिळाले आहे.

मा. महापौर :-

मला काय म्हणायचे आहे की आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आपण कोणाची अशी सेवा घेत असताना याची शहानिशा पहिल्यांदा करा. की जेणेकरुन पहिल्यांदा म्हणणार की आम्ही मोफत देत आहोत आणि नंतर मग सगळ्यांची सहानुभूती घेणार, सगळ्यांकडून वाहवा घेणार, आणि नंतर मग महापालिकेकडून पैसे घेणार. तर हे काही योग्य वाटत नाही पण याच्या नंतर अशी जर कोणी आली संस्था असे जर कोणी पुढाकार घेवून करत असेल तर त्याची शहानिशा होणे फार गरजेचे आहे. कारण लोकांमध्ये जो मेसेज जातो तर तो मेसेज चुकीचा जाता कामा नये. कारण प्रशासनाचा आपल्या स्व:तची एक संस्था आहे आणि आपण हे आपले कामकाज पारदर्शक करत असतो आणि यापुढेही पारदर्शकता त्याच्यामध्ये असावी जेणे करून नगरसेवकामध्ये किंवा मिरा भाईंदर शहरामध्ये अशा पध्दतीचे वातावरण निर्मिती होणार नाही.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम मी दोन मिनिटात संपवतो, डी.एम.सी. साहेबांनी जे उत्तर दिलेले आहे ते पुर्ण सभागृहाची दिशाभुल करणारे आहे. त्यावेळी डिएम.सी. म्हणतात की आम्ही त्यांना नोंटीस पाठवली की तो असे काही सोशल मेडियावर टाकले आहेस का त्याला नोंटीस द्यायची गरज काय आहे सोशल मेडियावर तर सर्व दिसत होते त्याचे पृफ आम्ही स्थायी समितीला दिले होते आणि त्याच्यावर कायदेशिर कारवाई करणार असे तत्कालिन अधिकाऱ्याने त्यावेळी आम्हाला सांगितले होते मा. आयुक्तांनी. कायदेशिर कारवाई झालीच नाही. त्याने माफी पत्र मागितले यांची माफी मागितली बस झाले विषय संपला पालिकेचे 50 लाख गेले लोकांमध्ये अपप्रचार व्हायचा होता तो झाला कारण एक संस्था फुकटमध्ये काम करते पण तिथले जे लोकप्रतिनिधी आहेत महापालिका क्षेत्रातातले ते करत

आहेत अशा प्रकारचे त्यावेळी मेसेज सोशल मेडियावर व्हॉटअॅपवर व्हायरल झाले होते मग त्याची भरपाई कोण करणार? ह्याने कोणा जवळ माफी मागितली त्याने माफी पत्र लिहून दिले आणि त्यावर कायदेशिर कारवाई का नाही झाली? महापालिकेची बदनामी झाली ती झालीचना. आणि परत आपण त्यांना पैसे पण देत आहोत. हा संपुर्ण प्रकार माझी मा. आयुक्तांना विनंती आहे की ह्या संपुर्ण प्रकरणाची चौकशी व्हावी आणि त्याला त्याने जो प्रकार केलेला आहे त्याच्यावर कायदेशिर आणि दंडात्मक कारवाई व्हावी जेणे करुन पुन्हा तो कोणा बरोपर तसा प्रकार परत करणार नाही.

संदिप शिंदे :-

सन्मा. पिठासीन अधिकारी महोदया सन्मा. सदस्यांनी हाच मुद्दा स्थायी समितीमध्ये सुध्दा उपस्थित केला होता. त्यावेळी सुध्दा मी त्याचे उत्तर दिले होते वन रुपीस क्लिनीक ने जे सोशल मेडियावर टाकले होते त्याची त्यांनी आमच्याकडे सुध्दा पृफ दिले होते. दोन्हीमध्ये फार तफावत होती त्याचा जो काही टाकण्याचा जो उद्देश होता त्याच्यामध्ये अस होत नव्हते क्लियर आम्ही ते सगळ चेक केले. स्क्रीन शॉट पण चेक केल्या, तरी सुध्दा आपण त्याला नोंटीस इश्यु केली बिल थांबवले होते त्याच्यावर त्याने क्लियर केलेले आहे की मी माझा टाकण्याचा उद्देश हा मोफत देणे मी मोफत सेवा देतो असा नव्हता महापालिका मोफत सेवा देते तथापी जर माझाकडून असे झाले नसेल तरी मी माफी मागतो. आणि तो खुलासा मी आयुक्त महोदय यांना दाखवला त्याची मान्यता घेतली त्याच्या नंतर त्याचे 25 लाख रुपये बिल अदा केले. कारण त्याने काम केलेले होते आणि जे काम केले होते त्याचे बिल तर आपल्याला अदा करावे लागेल.

मा. महापौर :-

त्याचे टेंडर काढले होते?

संदिप शिंदे :-

हो टेंडर काढून प्रोसिजर करुन केले होते. निविदा प्रक्रिया पुर्ण करुन केलेले होते आणि कमी दरामध्ये आपल्याला इतर महानगरपालिकेच्या तुलनेत त्याने कमी रेटमध्ये आपल्या इथे टेंडर भरलेले होते त्याच्यामुळे त्याचे जे काही सोशल मेडियावर टाकले त्याच्या बाबतीत त्याला आपण नोंटीस इश्यु केल्या नंतर त्याचा खुलासा मान्य करुन नंतर प्रक्रिया पुर्ण केलेली आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे. सन्मा. सदस्य भगवती शर्माजी आपण घोटाळा झाला असल्याचे याबाबत नमुद केलेले आहे. महासभेमध्ये आपण या संदर्भात प्रशासनावरती आरोप लावला आहे कृपया आपण ह्या मुद्यासह अभ्यास करुन माझा दालनामध्ये संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याच्या मार्फत माझा समोर खुलासा घ्यावा आणि संबंधित अधिकाऱ्यांनी सुध्दा माहिती सह उपस्थित रहावे तसेच सन्मा. सदस्या ढवण ताई गटनेत्या यांनी सुध्दा अग्निशामक या संदर्भामध्ये पगारा विषयी तफावत झाल्याचे ह्या ठिकाणी नमुद केलेले आहे त्यांच्याही विषयावरती प्रशासना मार्फत समाधानकारक उत्तर देण्यात यावे तसेच सन्मा. सदस्य अनिल सावंत जी यांनी सुध्दा ह्या विषयावरती जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यांनाही बोलवून त्यांनाही समाधानकारक उत्तर प्रशासना मार्फत देण्यात यावे. अॅड एस.ए. खान यांना बोलायचे आहे तर मी खान साहेबांना बोलायला संधी देते.

एस.ए.खान :-

सर्वांना नमस्कार, मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो, आमचे मित्र श्री. मुझ्झफर हूसेन साहेब माजी आमदार आणि मम्मीजी जिल्हा अध्यक्ष प्रमोदजी सावंत, गटनेता जुबेर इनामदार, नगरसेवक अनिल सावंत आणि सर्व पक्षाचे नगरसेवकांचे आणि सर्व पक्षाचे आमचे पदाधिकारी यांचे

आभार व्यक्त करतो. त्यांच्या आशीर्वादाने आम्हाला स्वीकृत सदस्याची संधी मिळाली आणि मी सभागृहाचे पण आभार मानतो आणि अपेक्षा करतो की त्यांचे सहकार्याची. धंन्यवाद.

मा. महापौर :-

आजची तहकुब सभा संपली असे मी ह्या ठिकाणी जाहिर करते.

(सभा संपण्याची वेळ दु. 2.28 वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका